

उपवासाच्या सर्व प्रकारच्या पदार्थासाठी ग्राहकांची प्रथम पसंती...
सर्वोत्कृष्ट प्रतिचा, स्वच्छ व चविष्ट
राजमोती साबुदाना
सर्वत्र उपलब्ध
1 Kg | 500 gm | 250 gm • इन्स्टंट साबुदाना सुद्धा उपलब्ध !



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, गुरुवार दि. १९.१२.२०२४ | अंक नं. २४४ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020



सहल थंड प्रदेशाची
• थर्मल • स्वेटर्स • जर्किन • ग्लोज • सॉक्स • कॅप्स्
बरंच काही एकाच ठिकाणी
आता पुण्यात सुद्धा..

जरीवाला • कापड बाजार, नं.9422226599 • यशोदानगर, पाईपलाईन रोड, • सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505

प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090


# गोवंशीय जनावरांची वाहतूक व कत्तल रोखण्यासाठी पोलिसांचा २४ तास पहारा

## झेंडीगेट परिसरात ३ फिक्स पॉइंट, २ पथकांची गस्त, वारंवार गोवंशीय जनावरांची हत्या करणाऱ्या कुरेशी टोळीविरुद्ध हद्दपारीचा प्रस्ताव

नगर – नगर शहरात झेंडीगेट परिसरात असलेल्या अवैध कत्तलखान्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर गोवंशीय जनावरांची कत्तल होत असल्याने ही कत्तल रोखण्यासाठी कोतवाली पोलिसांनी ठोस पावले उचलली आहेत. गेल्या १५ दिवसांपासून दररोज छापेमारी करूनही गोवंशीय जनावरांची कत्तल थांबत नसल्याने आता पोलिसांनी या परिसरात ३ फिक्स पॉइंट लावून तेथे २४ तास खडा पहारा सुरु केला असून २ पथकांची गस्त सुरु केली आहे. कत्तलखाने चालविणाऱ्या कुरेशी टोळीविरुद्ध हद्दपारीचा प्रस्तावही तयार करण्यात आला असल्याची माहिती कोतवालीचे पोलिस निरीक्षक प्रताप दराडे यांनी दिली.

नगर शहरात झेंडीगेट परिसरात नेहमीच मोठ्या प्रमाणावर गोवंशीय जनावरांची कत्तल करण्यात येते, स्थानिक गुन्हे शाखा, कोतवाली पोलिस वारंवार या कत्तलखान्यांवर छापे टाकून कारवाई करतात. मात्र कितीदा ही कारवाई केली तरी पुन्हा या ठिकाणी गोवंशीय जनावरांची कत्तल सुरु होते. गेल्या १५ दिवसांत तर स्थानिक गुन्हे शाखा व कोतवाली पोलिसांनी दररोज कारवाया केल्या. तरीही गोवंशीय जनावरांची कत्तल काही थांबण्याचे नाव घेत नाही. त्यामुळे कोतवालीचे पो.नि. दराडे यांनी आता ठोस उपाययोजना हाती घेतल्या आहेत. त्यानुसार झेंडीगेट परिसरात ३ फिक्स पॉइंट लावून तेथे पोलिसांचा २४ तास खडा पहारा सुरु केला आहे. या शिवाय डी.बी. च्या २ पथकांच्या मार्फत या कत्तलखान्यांकडे जाणाऱ्या सर्व रस्त्यांवर गस्त सुरु केली आहे.

अवैध कत्तल खाने चालवून त्यात वारंवार मोठ्या प्रमाणात गोवंशीय जनावरांची कत्तल करणाऱ्या कुरेशी टोळीविरुद्ध हद्दपारीचा प्रस्ताव तयार करून तो मंजुरीसाठी प्रांताधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यात आला आहे. या प्रस्तावाला मंजुरी मिळताच सदर टोळीला शहरातून हद्दपार केले जाणार असल्याचे पो.नि. दराडे यांनी सांगितले. या पुढील काळात कोतवाली पोलिस ठाण्याच्या हद्दीत एकाही गोवंशीय जनावरांची कत्तल होणार नाही याची दक्षता घेणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## गोवंशीय जनावरांचा टेम्पो केडगाव परिसरात पकडला


कत्तलीसाठी चालविलेल्या गोवंशीय जनावरांचा टेम्पो पकडल्यानंतर २ आरोपींसह कोतवाली पोलिसांचे पथक.

कत्तलीसाठी चालविलेल्या गोवंशीय जनावरांचा टेम्पो कोतवाली पोलिसांच्या पथकाने गुरुवारी (दि.१९) पहाटे पकडून ६ लाख ६५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. केडगावच्या लिंकरोडवर ही कारवाई करण्यात आली आहे.

पो.नि. प्रताप दराडे यांना गोपनीय माहिती मिळाली की, लिंक रोड येथे कल्याण रोड ते हॉटेल रंगोली कडे जाणाऱ्या रोड मार्गे अज्ञात इसम हे अशोक लेलँड मालवाहतूक टेम्पोमध्ये गोवंशीय जनावरे कत्तल करण्याकरीता घेवून जात आहेत. ही माहिती मिळताच त्यांनी गुन्हे शोध पथकातील पो.हे.कॉं. योगेश भिंगारदिवे, ए.पी. इनामदार, संभाजी कोतकर संदीप पितळे,दिपक मिसाळ, राजेंद्र पालवे, सचिन लोळगे यांना कारवाईसाठी पाठविले. या पथकाने लिंकरोडवर जावून संशयित एक पांढ-या रंगाचा अशोक लेलँड कंपनीचा टेम्पो (क्र. एमएच १६ ए वाय ६२८०) पकडला.त्यात चालक व अन्य एक असे दोघे होते. त्यांना नावे विचारल्यावर त्यांनी शहजहाँ अब्दुलकलीम कुरेशी (वय ३०, रा. बाबा बंगाली, शाळा नं. ४ जवळ, झेंडीगेट), समीर बाकर चौधरी (वय ३२, रा. नालबंद खुंट) असे सांगितले.

सदर टेम्पोचे पाहणी केले असता त्यामध्ये सहा गोवंशीय जनावरे मिळून आली. सदर जनावरांबाबत त्या दोघांना समाधानकारक उत्तर देता आले नाही. त्यामुळे या पथकाने १लाख ६५रुपये किंमतीचे गोवंशीय जनावरे तसेच ५ लाख रुपये किंमतीचा टेम्पो असा एकुण ६ लाख ६५ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या दोन आरोपींच्या विरुद्ध पो.हे.कॉं. रियाज इनामदार यांचे फिर्यादीवरुन कोतवाली पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २७१, ३(५), महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९९५ चे सुधारीत कायदा २०१५ चे कलम ५ (अ), ९ सह प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध अधिनियम १९६० चे कलम ११ सह महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१चे कलम ११९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## नागरीक, दुकानदार, विक्रेत्यांनी प्लास्टिक पिशव्यांचा वापर करू नये

### सिंगल यूज प्लास्टिकच्या वापरावर मनपाची कारवाई मोहीम सुरू

नगर – शासनाने सिंगल युज प्लास्टिकच्या वापरावर बंदी घातलेली असतानाही शहरात प्लास्टिकचा वापर मोठ्या प्रमाणात सुरू आहे. महानगरपालिकेच्या पथकाने सिंगल युज प्लास्टिक पिशव्या वापरणाऱ्यांवर कारवाईची मोहीम हाती घेतली असून, बुधवारी तेलीखुंट व डाळमंडई येथे कारवाई करत ६० किलो प्लास्टिक जप्त केले. तर १५ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

प्लास्टिकमुळे वाढत असलेल्या प्रदूषणामुळे राज्य शासनाच्या पर्यावरण मंत्रालयाने सिंगल यूज प्लास्टिकच्या वापरावर बंदी घातली आहे. अशा प्रकारच्या उत्पादनावरही बंदी घालण्यात आली आहे. मात्र, अद्यापही नागरीक, व्यापारी, दुकानदारांकडून सिंगल यूज प्लास्टिकच्या पिशव्यांचा वापर सर्रास सुरू आहे. माझी वसुंधरा अभियानात सिंगल यूज प्लास्टिकच्या वापरावर पूर्णपणे निर्बंध आणून त्याची कठोर अंमलबजावणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. अहिल्यानगर महानगरपालिकेने यापूर्वीही सिंगल यूज प्लास्टिकच्या वापरावर कारवाई केली आहे. नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली आहे. नागरिकांच्या प्रतिसादामुळे महानगरपालिकेला सलग दोन वर्षे दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे.

आता अहिल्यानगर महानगरपालिकेने माझी वसुंधरा अभियान ५.० व स्वच्छ सर्वेक्षण २०२४-२५ मध्ये सहभाग घेतला असून या दृष्टीने उपाययोजना केल्या जात आहेत. आपले शहर सिंगल यूज प्लास्टिकमुक्त करण्याचा महानगरपालिकेचा मानस आहे. त्यादृष्टीने जनजागृती केली जात आहे. सिंगल यूज प्लास्टिकच्या वापरावर कारवाई केली जात आहे.

नागरिकांनी पर्यावरणाचा विचार करून सिंगल यूज प्लास्टिकचा वापर बंद करावा, कागदी अथवा कापडी पिशव्या वापराव्यात, दुकानदार, खाद्यपदार्थ, भाजी विक्रेत्यांनीही सिंगल यूज प्लास्टिकच्या पिशव्या वापरू नये, शहर सिंगल यूज प्लास्टिकमुक्त करण्यासाठी नागरिकांनी या अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले आहे.


विनोद मेडिकलमध्ये शटरची कुलुपे तोडत आत प्रवेश करून गल्ला तोडल्याचे दिसत असून, चोरीसाठी वापरलेले साहित्य. (छाया – बबलू शेख)

## भिंगार शहरासह उपनगरात २ ठिकाणी धाडसी चोऱ्या

### मेडिकल व दक्षिणमुखी हनुमान मंदिरातील दानपेटी फोडून रोख रक्कम लंपास; गुन्हा दाखल






नगर – भिंगारच्या शुक्रवार बाजारात असलेले मेडिकल दुकान तसेच वडारवाडी येथील दक्षिणमुखी हनुमान मंदिरात चोऱ्या झाल्याच्या २ वेगवेगळ्या घटना गुरुवारी (दि.१९) पहाटे घडल्या आहेत. दोन्ही ठिकाणी चोरट्यांनी रोख रक्कम चोरून नेली आहे. मेडिकल मधील चोरीची घटना सीसीटीव्ही मध्ये कैद झाली आहे.

भिंगारच्या शुक्रवार बाजारात मशिदी शेजारी विनोद पोखरणा यांचे विनोद मेडिकल नावाचे औषधांचे दुकान आहे. पहाटे २ च्या सुमारास २ चोरट्यांनी कटरच्या सहाय्याने मेडिकलच्या शटरची कुलुपे तोडत आत प्रवेश केला. आतील साहित्याची उचकापाचक करत गल्लयात ठेवलेली ८ ते १० हजारांची रोकड चोरून नेली. दुकानाच्या शटरची कुलुपे तोडणारे २ चोरटे शेजारील मशिदीच्या सीसीटीव्ही मध्ये कैद झाले आहेत.

चोरीची ही घटना सकाळी उघडकीस आली, त्यानंतर पोखरणा यांनी भिंगार कॅम्प पोलिसांना घटनेची माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी भेट देत पाहणी केली व सीसीटीव्ही फुटेज तपासासाठी ताब्यात घेतले आहे.

दुसऱ्या घटनेत वडारवाडी येथील दक्षिणमुखी हनुमान मंदिराच्या खिडकीचे गज अज्ञात चोरट्यांनी कापून आत प्रवेश केला. या मंदिरात असलेल्या दानपेटीचे कुलूप तोडून दानपेटीतील अंदाजे १० ते १२ हजारांची रोकड चोरून नेली आहे. सकाळी परिसरातील नागरिक मंदिरात दर्शनासाठी आल्यावर त्यांच्या निदर्शनास ही चोरीची घटना आली. त्यानंतर त्यांनी भिंगार कॅम्प पोलिसांना घटनेची माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी भेट देत पाहणी केली. त्यानंतर पोलिसांनी श्वान पथकास पाचारण केले. पोलीस श्वानाने तेथील पडलेल्या कपड्याचा वास घेऊन आलमगीर कडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यापर्यंत माग काढला तेथून पुढे पोलीस श्वान रस्त्यावर घुटमळल्याने चोरटा तेथून कोणत्यातरी वाहनाने पळून गेला असावा असा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला. या दोन्ही चोऱ्यांबाबत दुपारी उशिरापर्यंत गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरु होती.


**Dr. N. J. Paulbudhe College of Pharmacy, Ahilyanagar.**

Applications are invited from aspiring & eligible Candidates for Admission at Institute level or seat remaining vacant after CAP round

**ADMISSION NOTICE – 2024-25**

- First Year B. Pharmacy (100) Choice Code 545182310
- First year M. Pharmacy Pharmaceutics (15) 545181710
- First year M. Pharmacy Pharmacology (15) 545182110
- First year M. Pharmacy Pharmaceutical Chemistry(15) 545182210

| Sr.No. | Activity | Schedule | |
|---|---|---|---|
| 1. | Issue & receipt application form | First Date 17/12/2024 | Last Date 23/12/2024 |
| 2. | Display of merit list | 23/12/2024 up to 05.00 pm | |
| 3. | Admission at institute | 23/12/2024 up to 05.00 pm | |

B.PHARMACY and M. PHARMACY (DTE CODE-5451)

http://bpharmacy.sspmonline.org/ Email. bpharmacydnjp@gmail.com
Admissions will be as per the norms of Admission Regulatory Authority, DTE and State CET Cell, Maharashtra State. For More Information Refer Respective Information Brochure 2024-25 Available On
www.cetcell.mahacet.org / www.dtemaharashtra.gov.in
Visit college for necessary help & Admission counseling

दर्जेदार व माफक दरात
फलेक्स प्रिंटींग
संपर्क : 9403232323

पाहिजेत
अहमदनगर जिल्ह्यातील नामांकित सुवर्णपेढी चंदुकाका ज्वेलर्सच्या अहमदनगर या मुख्य शोरूम साठी हवे आहेत
कॅशियर जागा-2 (M) — बँक, पतसंस्था येथे कॅशियर म्हणुन काम केल्यास प्राधान्य. टॅलीचे ज्ञान आवश्यक. पगार : 17000/-
सेल्समन जागा-5 (M/F) — तत्सम पदावर काम केल्याचा किमान 2 वर्षे अनुभव आवश्यक पगार : 15000/-
अनुभवींना प्राधान्य, आकर्षक पगार दिला जाईल.
इच्छुकांनी सविस्तर अर्ज बायोडाटा सह 7 दिवसांच्या आत समक्ष भेटावे.
शुध्दता, विश्वासार्हता, पारदर्शकता
चंदुकाका ज्वेलर्स
– सोने, चांदी व हिऱ्याचे व्यापारी –
वसंत टॉकिज रोड, अहमदनगर 0241-2321512

त्वरित पाहिजेत
आपल्या अहिल्यानगर मध्ये नामांकित फर्निचर शोरुममध्ये काम करण्याची सुवर्ण संधी
इंटेरिअर डिझायनर – 2 जागा
किमान 2-3 वर्षाचे अनुभव
( Auto Cad, 3D Drawing, MS Excel)
ड्राइव्हर - 1 जागा
(12 पास) किमान 5 वर्षाचे अनुभव
R K Interiors & Furniture
MIDC, Ahilyanagar
8275034148, 9133387555


डॉ.अद्वैत गिते
MBBS, MD (Medicine)
DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन
* डोकेदुखी, मायग्रेन * फिटचे आजार, अपस्मार
* हातपायाला मुंग्या येणे, नसांवरील सूज
* तोल जाणे * व्हर्टिगो, चक्कर येणे * अर्धांगवायू, पॅरेलीसीस * विसराळूपणा * थरथर सुटणे, पार्किन्सन
यावरील सर्व आजारांच्या निदानासाठी जपानमधील अत्याधुनिक सुप्रसिध्द निहोन- कोडेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.
अक्षय (गिते) हॉस्पिटल
बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर
मो : 9257575718, 9764416136
तपासणी शिबीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे
* सर्व आजारांसाठी ॲडमिट सुविधा उपलब्ध.
* सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.
एशियन नोबल हॉस्पिटल प्रेमदान चौक, अ.नगर रोज दुपारी १ ते ५ या वेळेत

VAISHNAVI TILES & TRADING CO.
• सर्व प्रकारच्या टाइल्स • ग्रॅनाइट • सॅनिटरी वेअर
• पीव्हीसी पाईप्स आणि फिटिंग • C.P. फिटिंग
9590151515 | 9262515151
प्लॉट नं.5, हुंडेकरी शोरूमच्या मागे, सावेडी, अहमदनगर
VARMORA KERAKOLL CARYSIL colortile RAK NIRALI TIMEX ICON

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## सायं पूजनाचे गमक




सामान्यतः सायंकाळी दिवे लागणीला घर किंवा कार्यालय व सार्वजनिक ठिकाणी लाईट, दिवे लावले तरी आपण श्रद्धेने हात जोडतो. एकमेकांना नमस्कार करतो.

दिवसांत एकूण आठ प्रहर असतात. दिवसाचे चार तर रात्रीचे चार. यात दिवसाचा चवथा प्रहर म्हणजे सायंकाळ, जो ५ ते ७ पर्यंत साधारणतः असतो. त्यानंतर पुढे प्रदोष चालू होतो.

सायंकाळ व कातरवेळ या दोघांत फरक असतो. संध्यामध्ये सूर्य अस्ताची वेळ आणि सूर्य अस्त झाल्यावर सायंकाळ व प्रदोष चालू होण्याची मधली वेळ हीच कातरवेळ असते, जी ६ ते ७.३० असू शकते. दिनमानानुसार ती बदलत जाते. जसे की उत्तरायणात सूर्यास्त उशिरा होतो तर दक्षिणायनात सूर्यास्त लवकर होतो.

काही लोक सांगतात की, ७.३७ मिनिटाला दिवा लावावा; कारण हा कामाख्या देवीचा तो आहे.



आता सायंकाळीच का दिवा लावतात. तिन्हीसांजेच्या वेळी वातावरणातील या वाईट शक्तींचे मुलांवर, सर्वांवर - मन, बुद्धीवर आक्रमण होण्याची शक्यता असते. तसेच वातावरणात सूक्ष्मजीव असतात. त्यांना आळा घालण्यासाठी उर्जा आवश्यक असते. दिवे लावून काही प्रमाणात उर्जा, प्रकाश मिळवता येतो. तुळशीस दिवा लावल्याने देवतांच्या सात्त्विक लहरींचे संरक्षककवच निर्माण होते. तात्पर्य सायंकाळची पूजा म्हणजेच प्रकाशाची, सकारात्मकतेची व देवाचीच पूजा...





एकविरा चौकातील चहा, मटका टपऱ्या तसेच पावभाजी स्टॉल हटविण्यात आले. महापालिकेचे अतिक्रमण विभागप्रमुख आदित्य बल्लाळ व प्रभाग अधिकारी बबनराव काळे, क्षेत्रीय अधिकारी जाधव, साबळे यांच्या उपस्थितीत चौकामधील संपूर्ण अतिक्रमणे हटविण्याची मोहीम राबविण्यात आली. (छाया - बबलू शेख)

# लोकप्रतिनिधींची बाहूली बनून अतिक्रमणांवर कारवाई करू नये

### श्रीमंतांच्या पक्क्या अतिक्रमणापासून प्रशासनाने सुरुवात करावी : अभिषेक कळमकर यांचे निवेदन

नगर - अहिल्यानगर शहरात सध्या महापालिकेमार्फत अतिक्रमण हटाव मोहीम सुरू करण्यात आली आहे. शहरातील रस्ते मोकळे असावेत, वाहतुकीला अडथळा निर्माण होऊ नये अशा अनेक कारणासाठी अतिक्रमणे हटवण्याचा निर्णय योग्य व स्वागतार्हच आहे. नगरकर या कारवाईचे स्वागत करीत आहे. परंतु महापालिकेने विधानसभा निवडणूक आटोपताच हा विषय हाताळण्याचे ठरवले यावरून अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. कारवाई निपक्षपातीपणे हवी तसेच कोणत्याही राजकीय दबावातून अथवा हस्तक्षेपातून कारवाई होता कामा नये अशी सर्वसामान्यांची भावना आहे, असे माजी महापौर अभिषेक कळमकर यांनी म्हटले आहे.

मनपाचे पथक गोरगरीब फेरीवाले, हातगाडी वाल्यांना लक्ष करून त्यांचा रोजगार हिरावून घेत आहे या कारवाईमुळे अनेकांवर उपासमारीची वेळ आली आहे. अनेकांनी कर्ज काढून रस्त्याच्या कडेला हातगाड्या लावून व्यवसाय टाकले आहेत. वर्षानुवर्षे त्यांच्या कुटुंबियांचे गुजरान या व्यवसायावर चालू आहे. मात्र आता अचानक महापालिकेने कारवाई सुरू केल्याने त्यांच्यासमोर प्रश्न निर्माण झाला आहे. या कारवाई निमित्त मनपा प्रशासनाने काही महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरे देणे आवश्यक आहे. मनपाकडून दररोज फेरीवाले, भाजी विक्रेते, हातगाडी वाल्यांकडून प्रत्येकी १० रुपये शुल्क पावती घेतली जाते. हे शुल्क नेमके कशासाठी असते याचा खुलासा होणे आवश्यक आहे. अतिक्रमण हटाव मोहीम सुरू करताना नेहमीच गोरगरीब, हातावर पोट असलेल्यांपासून सुरू होते. ही मोहीम कोणाच्यातरी इशाऱ्यावर चालते का असाही संशय निर्माण होत आहे. मनपाने पथारी वाल्यांचे बायोमेट्रिक पूर्ण केले आहे. आता त्यांनाच अतिक्रमण धारक समजून कारवाई केली जाते. या पथारी वाल्यांना जागा निश्चित का करण्यात आली नाही याचे उत्तर प्रशासनाने दिले पाहिजे.



अतिक्रमणांवर राजकीय दबावातून अथवा हस्तक्षेपातून कारवाई करु नये, याबाबतचे निवेदन देवून आयुक्त यशवंत डांगे यांच्याशी चर्चा करताना माजी महापौर अभिषेक कळमकर आदी.

सर्वोच्च न्यायालयाने राष्ट्रीय फेरीवाला धोरण २०१४ ची अंमलबजावणी करण्याचे आदेश स्थानिक स्वराज्य संस्थांना दिले आहे. त्या दृष्टीने नगर महापालिकेने आतापर्यंत हॉकर झोन जाहीर का केला नाही. शहरात पार्किंग झोन कुठे आहे हे सुद्धा जाहीर होणे आवश्यक आहे. अनेक प्रश्नांची सोडवणूक न करता केवळ सवंग प्रसिद्धीसाठी अतिक्रमण हटव मोहिमेची घोषणा करून गोरगरिबांना त्रास दिला जात आहे, हे अतिशय चुकीचे ठरणार आहे. कारवाई करताना आधी फेरीवाल्यांच्या पुनर्वसनासाठी सर्वांशी विचारविनिमय करून पर्यायी व्यवस्था करणे आवश्यक आहे. दुर्दैवाने महापालिका प्रशासनाला फेरीवाले धोरणाचा पूर्ण विसर पडला आहे.

शहरातील काही हॉस्पिटलने पार्किंग जागेत मेडिकल दुकानाचे अतिरिक्त बांधकाम केलेले आहे. मनपाच्या सर्वेक्षणात ही बाब समोर आली होती अशा हॉस्पिटल वर आत्तापर्यंत कारवाई झालेली नाही त्यामुळे निर्माण होणारा पार्किंगचा वाहतूक कोंडीची समस्या प्रशासनाला दिसत नाही. कोणाचातरी वरदहस्त असलेल्या काही ठराविक बिल्डर्सच्या मोठ्या संकुलामध्ये पार्किंगच्या जागेत बिनधास्त गाळे काढले जातात त्याकडे कानाडोळा केला जातो. मनपाचा नगररचना व अतिक्रमण विरोधी विभाग भ्रष्टाचाराने पोखरलेला आहे. मोठमोठ्या पक्क्या अतिक्रमणाच्या कितीतरी तक्रारी या विभागात पडून आहे त्याकडे अर्थपूर्ण दुर्लक्ष केले जाते. अतिक्रमणावर कारवाई करताना अनेक ठिकाणी पक्षपातीपणा होत असल्याचे निदर्शनास आले आहे. प्रशासनाने नगर शहर अतिक्रमण मुक्त करताना कोणाचाही रोजगार हिरावला जाणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे व शहरातील अतिक्रमणाची सुरुवात पक्क्या अतिक्रमणापासून करण्याच्या मागणीचे निवेदन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाचे शहर जिल्हा अध्यक्ष अभिषेक कळमकर यांनी दिले. यावेळी संजय झिंजे, निलेश मालपाणी, महिला राष्ट्रवादी काँग्रेस शहर अध्यक्ष नलिनी गायकवाड, माजी नगरसेवक आसाराम कावरे, ज्येष्ठ नागरिक सेलचे अध्यक्ष अंबादास बाबर, रजनीताई ताठे, रोहन शेलार, श्रावण काळे, भीमराज कराळे, अभिषेक जगताप, राहुल घोरपडे, चैतन्य ससे, अवि ठोंबरे, प्रशांत दरेकर आदीसह पदाधिकारी उपस्थित होते.

## अपघातात मयत झालेल्या अनोळखी व्यक्तींच्या ओळखीसाठी संपर्क साधण्याचे आवाहन

नगर - निंबळक शिवारातील बायपास रोड येथे झालेल्या अपघात मृत्यूमुखी पडलेल्या अनोळखी व्यक्तींची ओळख पटविण्यासाठी संपर्क साधावा, असे आवाहन एमआयडीसी पोलीस स्थानकाने केले आहे. हा अपघात लामखेडे पेट्रोलपंपाजवळ पुणे हायवे रोडवर १ मे २०२३ रोजी झालेला आहे. अपघात मृत्यू झालेल्या व्यक्तीचा मृतदेह सिव्हील हॉस्पिटल, अहिल्यानगर येथे नेऊन पोस्टमार्टम करण्यात आला.

मृत व्यक्तीचे वय अंदाजे ४० वर्षे, शरीर बांधा जाड, उंची अंदाजे १६५ सेमी, वर्ण सावळा-काळसर, अंगात विटकरी रंगाचा हाफ बाह्यांचा शर्ट आणि निळी पँट आहे.

या मृत व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नाही. त्याच्या नातेवाईक किंवा ओळखीच्या व्यक्तींनी पुढे येऊन ओळख पटवावी, असे आवाहन एमआयडीसी पोलीस स्थानकाच्यावतीने करण्यात आले आहे.

## भिस्तबाग येथील इमारतीतून बांधकाम साहित्याची चोरी

नगर - बांधकाम सुरू असलेल्या बिल्डिंगच्या रूम मधील फिटिंग केलेल्या वायर व बांधकामाचे साहित्य कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना सावेडी परिसरातील भिस्तबाग जवळील कुष्ठधाम रोडवरील पानसंबळ हॉस्पिटल समोर मंगळवारी (दि.१७) रात्री घडली.

याबाबत अनिकेत शरद मडूर (वय ३७, रा.पानसंबळ हॉस्पिटल समोर कुष्ठधाम रोड, भिस्तबाग अ.नगर) यांनी तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी मडूर यांच्या बिल्डिंगमध्ये एक वर्षापासून बांधकाम चालू आहे. मंगळवारी रात्री कामगारांनी बांधकाम संपवुन त्यांचे सर्व साहित्य बिल्डिंग मध्ये ठेवून निघून गेले. दुसऱ्या दिवशी सकाळी बिल्डिंग मध्ये काम करणारा सुतार रमेश मालविया हा कामास आला असता त्याला लाईट च्या केबल कट करून चोरी झालेल्या दिसल्या त्यांनी याबाबत मडुर यांना फोन करून कळविले. मडूर यांनी त्या ठिकाणी जाऊन पाहिले असता बिल्डिंगच्या तळमजल्याच्या पहिल्या मजल्यापासून ते पाचव्या मजल्यापर्यंत जिन्यामधील तसेच दुसऱ्या मजल्यावरील रूम मधील फिटिंग केलेल्या वायर कट करून चोरून नेलेल्या दिसून आल्या तसेच बिल्डिंग कामासाठी ठेवलेले हॅमर मशीन, ड्रिल मशीन, ऑटो रिव्हर्स मशीन, स्पॅनर ग्रीन बीट व इतर साहित्य असे ३० हजार रुपये किमतीचे बांधकाम साहित्य चोरीस गेल्याचे निदर्शनास आले.

याप्रकरणी तोफखाना पोलिसांनी अनिकेत मडूर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्यायसंहिता २०२३ चे कलम ३०५ (अ) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

## जयंत सांभार यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर - येथील रहिवासी जयंत शंकरराव सांभार (वय ५४, रा.बनेसाब पटांगण, अ.नगर) यांचे १९ डिसेंबर रोजी अल्पशा अजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, ३ भाऊ, भावजय, पुतणे असा परिवार आहे. प्रविण, प्रकाश, रवी सांभार यांचे ते धाकटे बंधू होत.

## सिंधुबाई गांधी यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर - केडगाव येथील एकता कॉलनीतील रहिवासी सिंधुबाई माणकचंद गांधी (वय ८६) यांचे १९ डिसेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या पश्चात १ मुलगा, सुन, नातवंडे, २ मुली, जावई असा परिवार आहे. त्या राजेंद्र गांधी (प्रवरासंगमवाला) यांच्या मातोश्री तर निलेश, निखिल, महेश यांच्या आजी होत.

## व्यापारी प्रकाशचंद नहार यांचे निधन



बीड - शहरातील मोंढा भागातील मिरचीचे व्यापारी प्रकाशचंद चैनसुख नहार (वय ६९) यांचे १८ डिसेंबर रोजी रात्री ९ वाजण्याच्या सुमारास निधन झाले. त्यांच्यावर १९ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता अंत्यसंस्कार करण्यात आला.

गेल्या अनेक वर्षांपासुन जैन श्रावक संघाच्या माध्यमातुन त्यांनी साधु-संतांची खुप सेवा केली. धार्मिक वृत्ती, उद्योजकता, सर्वांना सहकार्य करण्याची प्रवृत्ती ही त्यांच्या स्वभावाची वैशिष्ट होती. त्यांच्या दुःखद निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. शहरातील उद्योजक सर्वश्री राजेंद्र, संजय, अजित व किशोर नहार यांचे ते ज्येष्ठ बंधू तर प्रितम नहार यांचे ते वडील होत. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा दोन विवाहीत मुली, चार भाऊ, तीन बहिणी, सुना, नातवंडे असा परीवार आहे.



शिक्षण विभागाने शिक्षकांवर दबाव टाकू नये, या मागणीचे निवेदन मुख्याध्यापक शिक्षक शिक्षकेतर संघटना समन्वय समितीच्यावतीने माध्यमिकच्या उपशिक्षणाधिकारी संध्या भोर व कार्यालयीन अधीक्षक महावीर धोदाड यांना देण्यात आले.

## नवभारत साक्षरता सर्वेक्षणावर शिक्षकांचा बहिष्कार कायम

नगर - नवभारत साक्षरता सर्वेक्षणावर शिक्षकांचा बहिष्कार कायम असताना शिक्षण विभागाने शिक्षकांवर दबाव टाकू नये, या मागणीचे निवेदन मुख्याध्यापक शिक्षक शिक्षकेतर संघटना समन्वय समितीच्या वतीने माध्यमिकच्या उपशिक्षणाधिकारी संध्या भोर व कार्यालयीन अधीक्षक महावीर धोदाड यांना देण्यात आले.

यावेळी मुख्याध्यापक संघाचे जिल्हाध्यक्ष सुनील पंडित, माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष आप्पासाहेब शिंदे, जुनी पेन्शन कोर कमिटीचे राज्य सचिव महेंद्र हिंगे, बाबासाहेब मुळे, वैभव सांगळे, तौसीफ शेख, सचिन गुंजाळ, कैलास घोडके, कमलेश पवार, अरुण चौधरी आदींसह शिक्षक उपस्थित होते.

अहमदनगर जिल्हा मुख्याध्यापक शिक्षक शिक्षकेतर संघटनेच्या वतीने २२ ऑगस्ट रोजी पत्र देऊन शालाबाह्य कामे असलेल्या नवभारत साक्षरता सर्वेक्षणावर बहिष्कार टाकण्यात आलेला आहे. तरी देखील काही तालुक्यांमध्ये अजूनही काही गट शिक्षणाधिकारी मुख्याध्यापक व शिक्षकांना नवभारत साक्षरता सर्वेक्षण करण्यासाठी दबाव टाकत असल्याचा आरोप संघटनेच्या वतीने करण्यात आला आहे.

सध्या सर्व शाळांमध्ये पदभरती नसल्यामुळे निम्मे शिक्षक कार्यरत आहेत. तसेच काही शिक्षकांना बीएलओचे कामे दिलेली आहेत. त्याचप्रमाणे सध्या आधार अपडेट, आधार कार्ड काढणे, वाचन प्रकल्प, घटक चाचणी परीक्षा, विविध शिष्यवृत्तीचे अर्ज भरणे इत्यादी कामे चालू आहेत. त्यामुळे नवभारत साक्षरता सर्वेक्षणावर शिक्षकांचा बहिष्कार राहणार आहे. सदर योजनेतील कामे सर्व शालाबाह्य असून, हे कामे करण्यासाठी मुख्याध्यापक व शिक्षकांवर दबाव टाकू नये, अशी मागणी मुख्याध्यापक शिक्षक शिक्षकेतर संघटना समन्वय समितीच्या वतीने करण्यात आली आहे.

## ओबीसी समाजाचा आवाज दाबण्याच्या उद्देशाने छगन भुजबळांना मंत्रीमंडळातून सारले बाजूला

### सरकारला किंमत मोजावी लागणार : भरत गारुडकर, शहरातील समता परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी घेतली भेट

नगर - महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळात समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष तथा छगन भुजबळ यांना डावलले गेल्याने संपूर्ण महाराष्ट्रात नाराजीचे सूर उमटत आहे. शहरातील महात्मा फुले समता परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी नाशिक येथे जावून भुजबळ यांची भेट घेतली. भुजबळ यांच्या पुढील निर्णयापर्यंत सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते संयम पाळत असल्याचे स्पष्ट करुन एकसंघपणे सर्व त्यांच्या पाठीशी राहणार असल्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.



समता परिषदेचे जिल्हा उपाध्यक्ष भरत गारुडकर यांनी छगन भुजबळ यांची भेट घेऊन चर्चा केली.

महात्मा फुले समता परिषदेचे जिल्हा उपाध्यक्ष भरत गारुडकर यांनी भुजबळ यांची भेट घेऊन चर्चा केली. यावेळी संकेत खामकर, संजय डाके, बंडू कोथिंबीरे, अर्जुन लोंढे आदी उपस्थित होते. भुजबळ यांनी पदाधिकारी व कार्यकर्त्यांना आक्रमक पवित्रा न घेता संयमाने समाजकारण करण्याचे आवाहन केले.

जातीय प्रवृत्तीतून ओबीसी समाजाचा आवाज दाबण्याच्या उद्देशाने छगन भुजबळ यांना मंत्रीमंडळातून बाजूला करण्यात आले आहे. या राजकीय भूमिकेमुळे सर्व ओबीसी समाज नाराज असून, याची किंमत देखील भविष्यात सरकारला मोजावी लागणार आहे. ओबीसींच्या संयमाचा बांध तुटू देऊ नये. भुजबळ यांना एकटे पाडण्याचा डाव असून, या दबावतंत्राला ओबीसी समाज बळी पडणार नाही. सर्व समता परिषद व ओबीसी समाज त्यांच्या पाठिशी एकवटला असल्याची भावना भरत गारुडकर यांनी व्यक्त केली आहे.

## केडगाव येथील मटका अड्ड्यावर छापा

नगर - केडगाव येथील अंबिका हॉटेल शेजारील टपरीच्या आडोशाला सुरु असलेल्या मटका अड्ड्यावर कोतवाली पोलिसांच्या पथकाने छापा टाकत रोख रक्कम व मटका जुगाराचे साहित्य असा ६१० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

या कारवाईत मटका घेणारा मनोहर वसंत ससाने (वय ४५, रा. अंबिका हॉटेल शेजारी केडगाव) याला ताब्यात घेतले. त्याच्याविरुध्द कोतवाली पोलीस ठाण्यात मुंबई जुगार कायदा कलम १२ (अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अधिक तपास पोलीस हवालदार संदीप पितळे करीत आहे.

यु फोम, बॉंडेड फोम, हिटलॉन फोम, फोम मॅट्रेसेस्,बेड बॅक, सोफा क्लॉथ, वेलवेट क्लॉथ, सोफा कव्हर्स, सोफा रनर पट्टी, नविन सोफा फ्रेमसह तयार करुन मिळेल, धुळी पासुन संरक्षणसाठी प्लास्टीक तयार पडदे.
गुलाबचंद कारपेटवाला
खिस्तगल्ली, जुना कापड बाजार मागे, अहमदनगर.
मो. ९४२२३३९४६०,९४२२३३९४४२,९४२२४५४००५





अ.ए.सो. चे रुपीबाई मोतीलालजी बोरा-न्यू इंग्लिश स्कूल, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे दोन दिवसीय वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ पार पडले.

# यशस्वी होण्यासाठी जीवनात शिस्त महत्त्वाची

### डॉ. आशिष भंडारी यांचे प्रतिपादन; रुपीबाई मोतीलालजी बोरा न्यू इंग्लिश स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

नगर - आपल्या शालेय जीवनातील संस्कार व शिस्तीचा उपयोग त्यांना दररोजच्या प्रशासकीय कामात होत असून, त्या संस्कारांमुळेच निर्माण झालेल्या सामाजिक जाणीवेतून दररोज समाजातील सर्व थरांतून येणाऱ्या रुग्णांची सेवा केली जाते. कोरोना या जागतिक महामारीमध्ये आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या माध्यमातून केलेल्या समाजसेवेबद्दल कोरोना योद्धा हा पुरस्कार मिळाला तर जनतेकडून देवदूतची उपाधी मिळाल्याचे डॉ. आशिष भंडारी यांनी सांगितले.

अ.ए.सो. चे रुपीबाई मोतीलालजी बोरा-न्यू इंग्लिश स्कूल, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे दोन दिवसीय वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात पार पडले. तसेच विद्यार्थ्यांच्या कला-गुणांना प्रोत्साहन देण्यासाठी भरविण्यात आलेल्या कला, कार्यानुभव, रांगोळी, गणित व विज्ञान प्रदर्शनाला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला.

संध्याकाळी संस्थेच्या डॉ.आर.बी. मोने कला मंदिरात स्नेहसंमेलनाचा सांस्कृतिक कार्यक्रम रंगला होता. पहिल्या दिवशी (इयत्ता ५ वी ते ८ वी) झालेल्या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन आदर्श सरपंच रोहिणीताई लवांडे तर दुसऱ्या दिवशी (इयत्ता ९ वी ते १२ वी) झालेल्या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन आनंदऋषीजी हॉस्पिटलचे प्रशासनाधिकारी डॉ. आशिष भंडारी यांच्या हस्ते झाले. यावेळी पायल भंडारी, संस्थेचे उपाध्यक्ष अशोक मुथा, प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, सहकार्यवाह गौरव फिरोदिया, खजिनदार प्रकाश गांधी, विश्वस्त सुनंदाताई भालेराव, ॲड. गौरव मिरीकर, सल्लागार भूषण भंडारी, विद्यालयाचे प्राचार्य अजयकुमार बारगळ, उपप्राचार्या वंदना आरण्ये, पर्यवेक्षक बाळासाहेब वाबळे, शिक्षक प्रतिनिधी नितीन कमलकर, विद्यालयाचे आदर्श छात्र सिद्धार्थ लांडगे, सोहम गांधी, आदर्श छात्रा संचिता लांडगे, कीर्ती गुंड आदींसह शालेय शिक्षक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

प्रास्ताविक संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया यांनी केले. त्यांनी विद्यालयातील गुणवत्ताधारक तसेच कला, क्रीडा व विविध क्षेत्रातील पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांचा सन्मान करत विद्यालयाच्या प्रगतीबद्दल कौतुक केले. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य अजयकुमार बारगळ यांनी सर्व पाहुण्यांचा परिचय करून दिला. उपस्थित पाहुण्यांनी विद्यार्थ्यांचे प्रदर्शन पाहून तयार केलेल्या विविध कलाकृतींचे व त्यांच्यातील जिज्ञासूवृत्तीचे भरभरून कौतुक केले.

आदर्श सरपंच रोहिणीताई लवांडे यांनी माजी विद्यार्थी या नात्याने शाळेविषयीच्या भावना व्यक्त केल्या. त्यांनी आदर्श गाव निर्मिती करण्यापासून ते माजी राष्ट्रपती प्रतीभाताई पाटील यांच्या हस्ते आदर्श सरपंच पुरस्कार मिळेपर्यंतच्या खडतर प्रवासाचे वर्णन करत वेळोवेळी शालेय जीवनातील शिस्त आणि संस्कार याचा कसा फायदा झाला? याबद्दल मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख अतिथींचे स्वागत घोषपथकाच्या माध्यमातून करत सरस्वतीपूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी विद्यालयाच्या एन.सी.सी. छात्रांनी पाहुण्यांना मानवंदना दिली. विद्यार्थ्यांनी ईशस्तवन व स्वागतगीतांद्वारे मान्यवरांचे सूर-तालात स्वागत केले. सदर वार्षिक स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमात पाहुण्यांच्या हस्ते शैक्षणिक, कला, क्रीडा व विविध क्षेत्रातील गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण देऊन सन्मान करण्यात आला.

सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरुवात सुमारे ८० ढोलवादक विद्यार्थ्यांच्या घोषपथकाने झाली. विद्यार्थ्यांनी बालगीते नाच रे मोरा.. गणेशवंदना..खंडोबाचा जागर.. या लोकप्रिय गीतांवर लयबद्ध सादरीकरण केले. सहभागी सर्वांचे कौतुक केले. यावर्षी इ.५ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांनी भुली बिसरी यादे.. तर इ.९ वी ते १२ वी च्या विद्यार्थ्यांनी अस्मिता महाराष्ट्राची... या विषयावर बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमास उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.

भुली बिसरी यादे.. मध्ये अनेक जुन्या गाण्यांच्या माध्यमातून जुन्या आठवणीना उजाळा देण्यात आला तर अस्मिता महाराष्ट्राची.. मधील गाण्यांद्वारे आपल्या महाराष्ट्रातील संस्कृतीचे दर्शन घडविण्यात आले.

सूत्रसंचालन सचिन कराळे व मोनाली खोचरे यांनी केले तर सांस्कृतिक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोमनाथ नजान व स्मिता कुलकर्णी यांनी केले. आभार शिक्षक प्रतिनिधी नितीन कमलकर यांनी मानले.

# श्री संताजी महाराज पुण्यतिथीनिमित्त २१ डिसेंबरपासून 'गाथा पारायण'



नगर - तिळवण तेली समाज ट्रस्टच्यावतीने संत शिरोमणी श्री संताजी जगनाडे महाराज पुण्यतिथीनिमित्त जगद्गुरु संत तुकाराम महाराज पंचमवेद गाथा पारायण सोहळ्याचे २१ ते २७ डिसेंबर या कालावधीमध्ये संत तुकाराम महाराज गाथांचे लेखक राष्ट्र संत शिरोमणी श्री संताजी जगनाडे महाराजांच्या पुण्यतिथी निमित्त हभप रामदास महाराज क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केला आहे, अशी माहिती ट्रस्टचे अध्यक्षा निता लोखंडे यांनी दिली.

संताजी भवन श्री विठ्ठल-रुख्मिणी मंदिर, तेली पंचाचा वाडा, डाळ मंडई, नगर येथे २१ ते २७ डिसेंबर या कालावधीत स. ८ ते १२.३० या वेळेत गाथा पारायण सायं. ४ ते ५ सरस्वती महिला भजनी मंडळाचा भजनाचा कार्यक्रम होईल. तसेच सायंकाळी ५ ते ६ मध्ये हरिपाठाचे आयोजन करण्यात आले आहे. २८-१२-२०२४ स.८.३० ते १०.३० वा हभप रामदास महाराज क्षीरसागर यांचे गुलालाचे किर्तन होईल. त्यानंतर सकाळी ११ वा. मिरवणुक होईल. मिरवणुकीनंतर संताजी महाराज यांच्या मुर्तीची पूजा व आरती होऊन पुष्पवृष्टी करण्यात येईल. दु. १ ते ४ महाप्रसादाचे आयोजिन करण्यात आले आहे.

दररोज पहाटे ६ ते ७ काकडा भजन, दु. ४ ते ५ नामजप व सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ होईल. तरी सर्व समाज बांधवांनी सर्व कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन ट्रस्टचे उपाध्यक्षा शोभना धारक, सचिव शशिकांत देवकर, खजिनदार प्रकाश सैंदर, विश्वस्त प्रसाद शिंदे, मनोज क्षिरसागर, सागर काळे, गोकूळ कोटकर, दत्तात्रय डोळसे, आदिच्यावतीने करण्यात आले आहे. सप्ताहाच्या सांगता प्रसंगी श्री संताजी भवन, दाळ मंडई येथे २८-१२-२०२४ रोजी दुपारी १ ते ४ या वेळेत आनंदऋषीजी नेत्रालय व डॉ. सदाशिव कोल्हे यांचे वतीने मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. याचा लाभ सर्व समाज बांधवांनी घ्यावा असे आवहान तिळवण तेली ट्रस्ट च्या वतीने करण्यात आले आहे.

# 'विखे पाटील फार्मसी'च्या विद्यार्थ्यांचे अविष्कार संशोधन स्पर्धेत नेत्रदीपक यश



कल्याण बेळगे



अक्षिता बागडी



रुचिता पाटोळे



संध्या काळे

नगर - डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फार्मसी कॉलेज, अहिल्यानगर महाविद्यालयातील बेळगे कल्याण, बागडी अक्षिता, पाटोळे रुचिता, काळे संध्या या विद्यार्थ्यांनी औषधनिर्माणशास्त्र शाखेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे अंतर्गत अविष्कार संशोधन स्पर्धेत नेत्रदीपक कामगिरी केली असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रताप यांनी दिली.

विद्यार्थ्यांना प्रा.डॉ.गणेश गोडगे, प्रा.ज्योती वाडेकर व प्रा.मनीष रासकर यांनी मार्गदर्शन केले. अविष्कार संशोधन कमिटीचे सदस्य डॉ. स्मिता मिरेकर व डॉ.गणेश बरकडे यांचे सहकार्य लाभले.

# नगरच्या कोहिनूर मॉलमध्ये २२ ते २७ डिसेंबर दरम्यान 'मोफत आर्ट एग्झिबिशन आणि वर्कशॉप'चे आयोजन

नगर - सावेडी, अहमदनगर येथील कोहिनूर मॉलमध्ये २२ ते २७ डिसेंबर दरम्यान मोफत आर्ट एग्झिबिशन आणि वर्कशॉप आयोजित करण्यात आले आहे.

या कार्यक्रमात कलाकार विकास कांबळे, अशोक डोळसे, जयेश काळे, बालाजी वल्लाल, सचिन घोडे आणि सत्यम लुणिया सहभागी होणार आहेत. वारली पेंटिंग, शिल्पकला, खडू शिल्पकला, कॅलिग्राफी, स्क्रॅप आर्ट आणि पेंटींगचे वर्कशॉप यावेळेस घेण्यात येणार आहे.

दररोज सायंकाळी ४ ते ५ या वेळत हे वर्कशॉप घेतले जातील. वर्कशॉपमध्ये सहभागी होण्यासाठी ९३०९७३९९२८ या नंबरवर रजिस्ट्रेशन करणे आवश्यक आहे. तसेच प्रदर्शन संपूर्ण दिवसभरासाठी सर्वांसाठी खुले असून कलाप्रेमींना या कलाकारांच्या उत्कृष्ट कलाकृती पाहायला मिळणार आहेत.

कलाकारांची मेहनत आणि प्रतिभेला व्यासपीठ मिळावे हा आमचा उद्देश आहे. नगरकरांनी या प्रदर्शनाला भेट देऊन कलाकारांना प्रोत्साहन द्यावे आणि वर्कशॉपमध्ये सहभागी होऊन नवीन कला शिकण्याच्या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन मॉलच्यावतीने श्वेता गांधी यांनी केले आहे.

# राष्ट्रीय उर्जा संवर्धन सप्ताहनिमित्त २० डिसेंबरला नगर शहरात 'जनजागृती रॅली'

नगर - सध्या सुरु असलेल्या राष्ट्रीय उर्जा संवर्धन सप्ताहानिमित्त अहिल्यानगर महावितरण मंडल कार्यालय व शहरातील सौर ऊर्जा व्यावसायिक यांच्या संयुक्त विद्यमाने पंतप्रधान सूर्य घर योजनेच्या प्रचार व प्रसाराकरिता तसेच ऊर्जा बचतीबाबत नागरिकांमध्ये जागृती होण्याच्या उद्देशाने २० डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता विशेष जनजागृती मोटरसायकल रॅलीचे आयोजन करणात आले आहे. जिल्हाधिकारी सिद्धराम सालीमठ यांच्या हस्ते बालिकाश्रम रोड वरील महावितरणच्या कक्ष कार्यालयापासून या रॅलीचे उद्‌टन होणार आहे, अशी माहिती महावितरणचे अधिक्षक अभियंता रमेश पवार यांनी दिली.

याबाबत अधिक माहिती देताना महावितरणचे कार्यकारी अभियंता योगेश चव्हाण म्हणाले की, १४ ते २१ डिसेंबर या आठवड्यात दरवर्षी राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. या दरम्यान विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. पंतप्रधान सूर्य घर योजनेमध्ये नगर जिल्ह्याकरिता मोठे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून जवळपास २५ हजार घरांवर सोलर सिस्टीम बसवण्याचे उद्दिष्ट महावितरण समोर आहे. पंतप्रधान सूर्यघर योजनेच्या बाबतीत भारतामध्ये महाराष्ट्र राज्याने मोठी भरारी घेतली असून, अजून मोठे उदिष्ट गाठण्याकरिता महावितरण प्रयत्नशील आहे.

नगर शहरातील सौर व्यावसायिक, विविध विद्युत उपकरणे वितरक, महाउर्जा, वित्तीय संस्था, बॅका यांच्या साथीने जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे. ही रॅली बालिकाश्रम रोड वरील महावितरणच्या कक्ष कार्यालयापासून निघणार असून महावितरण मंडल कार्यालय येथे समाप्त होणार आहे. या रॅलीमध्ये शहरातील नागरिक, महिला, विद्यार्थी सहभागी होऊ शकतात. अधिक माहितीसाठी ऑल इंडिया रिन्युएबल एनर्जी असोसिएशनचे जिल्हा संचालक अमित काळे मोबाईल नं. ९४२२२२४८८४ यांच्याशी संपर्क साधावा.



रामराव चव्हाण माध्यमिक विद्यालयाच्या प्रांगणात वार्षिक बालक्रीडा मेळाव्याचे उद्घाटन करताना प्राचार्य शिवाजीराव घाडगे आदींसह शिक्षकवृंद.

# मैदानी खेळामुळे विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वास वाढतो

### प्रा. शिवाजीराव घाडगे यांचे प्रतिपादन; नागापूर येथील रामराव चव्हाण माध्यमिक विद्यालयात रंगला बालक्रीडा महोत्सव

नगर - खेळाडूंना अभ्यासासोबत खेळाचे महत्त्व विशद केले. कोणताही खेळ हा स्पर्धेपुरता न खेळता पुढे त्याचा सराव सातत्याने चालू ठेवण्याचे आवाहन प्राचार्य शिवाजीराव घाडगे यांनी केले. मुलांना खेळात करिअर करायचे असेल तर पालकांशी सुसंवाद साधणे गरजेचे आहे. खेळामुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढतो. एकतरी आवडीचा मैदानी खेळ खेळण्याचे त्यांनी सांगितले.

नागापूर येथील रामराव चव्हाण माध्यमिक विद्यालयाचा वार्षिक बालक्रीडा मेळावा शाळेच्या प्रांगणात उत्साहात पार पडला. झालेल्या विविध क्रीडा स्पर्धेत विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन आपल्या क्रीडा कौशल्याची चुणूक दाखवली. बालक्रीडा मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य शिवाजीराव घाडगे, संस्थेचे सहसचिव नितीन घाडगे, क्रीडा विभाग प्रमुख व पर्यवेक्षक दत्तात्रय दरेकर, संतोष उरमुडे, जगदीश आव्हाड , राजेंद्र शिंदे , उल्का गवते, नंदा दुधाने, सुनंदा शिरसाठ, कोमल पाटील, भूतमपल्ले मॅडम, राजू नरोडे, कैलास उमाप, केशव गुंजाळ, राजकुमार इटेवाड, रामभाऊ पोटे, अभिजीत सांगळे, नितीन शिंदे, सोनवणे आदींसह शिक्षक वृंद, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

पर्यवेक्षक दत्तात्रय दरेकर यांनी खेळाडूंना मार्गदर्शन करुन जीवनात खेळाचे महत्त्व पटवून दिले. खेळामध्ये जय-पराजय महत्त्वाचा नसून स्पर्धेत उतरणे व आपल्यातील कौशल्य दाखवणे महत्त्वाचे असते. शाळेच्या विद्यार्थ्यांनी उद्घाटनाप्रसंगी ढोल ताशाच्या गजरात सादरीकरण केले. यावेळी खो-खो, कबड्डी, थाळीफेक, गोळा फेक, धावणे मनोरंजनाचे खेळ, स्लो सायकलिंगचे सामने मैदानावर अतिशय चुरशीने रंगले होते. पंच म्हणून संतोष उरमुडे, कैलास उमाप तसेच कोलते, तिकटे, कवाने, रोमन यांनी काम पाहिले. सूत्रसंचालन करुन राजू नरोडे यांनी आभार मानले.

# भुतकरवाडी येथील औदुंबर कॉलनीतील मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमाने दत्त जन्मोत्सव साजरा

### दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा....भजनाने भाविक मंत्रमुग्ध



औदुंबर कॉलनीतील दत्त मंदिरात जन्मोत्सव विविध धार्मिक कार्यक्रमाने साजरा करण्यात आला.

नगर - श्री स्वामी समर्थ ज्येष्ठ नागरिक संघ, भुतकरवाडी सावेडी व परिसरातील नागरिक यांच्या सहकार्याने औदुंबर कॉलनीतील श्री दत्त उद्यानातील श्री गुरुदत्त मंदिरात दत्त जयंती उत्सव साजरा केला. यावेळी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सकाळी मनोज कळमकर व त्यांच्या पत्नीने श्रीला अभिषेक केला. त्यानंतर दुपारी स्वर मंदिर महिला भजनी मंडळाने दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा, दत्त नामाची ओढ लागली, दत्ता दिगंबरा या हो स्वामी मला भेट द्या. या भजनांनी भाविक मंत्रमुग्ध झाले. श्री स्वामी समर्थ जेष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष भीमाशंकर लांडे व सौ.रत्नमाला लांडे यांच्या हस्ते श्री दत्तात्रेय भगवान यांची महाआरती करण्यात आली.

यावेळी बाबासाहेब वाकळे, अनिल बोरुडे व सौ.पुष्पाताई बोरुडे, सौ.वंदनाताई ताठे, दगडूमामा पवार, रवींद्र बारस्कर, विलास ताठे व कराळे हेल्थ क्लबचे चेअरमन शिवाजी कराळे यांच्या हस्ते श्री गणेश, श्री गुरु दत्त, साईबाबा व श्री स्वामी समर्थ आदी दैवतांची आरती करण्यात आली. यानंतर साबुदाणा खिचडीचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी उदय कराळे, ज्येष्ठ नागरिक संघाचे खजिनदार विश्वनाथ जाधव, कार्याध्यक्ष संभाजी काळे, सचिव अप्पा बेद्रे, संघांचे सदस्य मणिराम सावरकर, सुनील काळे, रमेश मुसळे, रघुनाथ कोतकर, चंद्रशेखर सत्रे, दत्तात्रय भगत यांच्यासह परिसरातील नागरिक व भाविक उपस्थित होते. दुसऱ्या दिवशी महाप्रसादाची व्यवस्था सौ.रत्नमाला लांडे यांच्यातर्फे करण्यात आली होती.

# 'राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेत' अहिल्यानगर केंद्रातून 'मर्म' प्रथम

मुंबई - ६३ व्या महाराष्ट्र राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धेत अहिल्यानगर केंद्रातून रंगमुद्रा युवा प्रतिष्ठान, वडगाव या संस्थेच्या मर्म या नाटकाला प्रथम पारितोषिक तसेच सप्तरंग थिएटर्स, अहिल्यानगर या संस्थेच्या पंचमवेद या नाटकास द्वितीय पारितोषिक जाहीर झाल्याची घोषणा सांस्कृतिक कार्य संचाल बिभीषण चवरे यांनी केली आहे. या दोन्ही नाटकांची अंतिम फेरीसाठीही निवड करण्यात आली आहे.

सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे आयोजित या स्पर्धेच्या प्राथमिक फेरीचे अहिल्यानगर केंद्रावरील अन्य निकाल पुढीलप्रमाणे- जय बजरंग युवा सांस्कृतिक, क्रिडा, ग्रामीण, शैक्षणिक मंडळ, अहिल्यानगर या संस्थेच्या झिम पोरी झिम या नाटकासाठी तृतीय पारितोषिक प्राप्त झाले आहे. दिग्दर्शन: प्रथम पारितोषिक रियाज पठाण (नाटक- मर्म), द्वितीय पारितोषिक डॉ. शाम शिंदे (नाटक- पंचमवेद), प्रकाश योजना प्रथम पारितोषिक गणेश लिमकर (नाटक- ती तिचा दादला आणि मधला), द्वितीय पारितोषिक पवन पोटे (नाटक- झिम पोरी झिम), नेपथ्य : प्रथम पारितोषिक अंजना मोरे (नाटक- अमाशी), द्वितीय पारितोषिक क्षितीज कंठाळे (नाटक- झिम पोरी झिम), रंगभूषा : प्रथम पारितोषिक चंद्रकांत सैंदाणे (नाटक- राजर्षी), द्वितीय पारितोषिक संकेत शाह (नाटक-झिम पोरी झिम) उत्कृष्ट अभिनय रौप्यपदक सिध्दी कुलकर्णी (नाटक- कन्यादान) व कृष्णा वाळके (नाटक- प्रियंका आणि दोन चोर), अभिनयासाठी गुणवत्ता प्रमाणपत्रे रेणुका ठोकळे (नाटक- प्रियंका आणि दोन चोर), शुभदा पटवर्धन (नाटक- मर्म), पुनम कदम (नाटक- राजर्षी), पल्लवी दिवटे (नाटक- तो तिचा दादला आणि मधला), नानाभाऊ मोरे (नाटक- तो तिचा दादला आणि मधला), प्रदीप वाळके (नाटक - आता कसं करु), संजय लोळगे (नाटक- झिम पोरी झिम), अथर्व धर्माधिकारी (नाटक- आता कसं करु)

२५ नोव्हेंबर ते १३ डिसेंबर या कालावधीत माऊली सांस्कृतिक सभागृह, अहिल्यानगर येथे झालेल्या स्पर्धेत एकूण १४ नाट्यप्रयोग सादर करण्यात आले.

स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून शंकर घोरपडे, डॉ. राजीव मोहोळकर आणि डॉ. उषा कांबळे यांनी काम पाहिले.

सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी पारितोषिक प्राप्त संघांचे तसेच इतर पारितोषिक प्राप्त कलाकारांचे अभिनंदन केले असून भविष्यातही या संघांनी व कलाकारांनी सर्वोत्तम कामगिरी करावी, अशी अपेक्षा व्यक्त केलेली आहे.

# आय.एम.एस.च्या वतीने 'जॉय ऑफ गिव्हिंग' ख्रिसमस दान संकलन उपक्रम



आय.एम.एस.च्या वतीने 'जॉय ऑफ गिव्हिंग' ख्रिसमस दान संकलन उपक्रम साजरा करण्यात आला.

नगर - बी.पी.एच.ई. सोसायटीच्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, करिअर डेव्हलपमेंट अँड रिसर्च (आय.एम.एस.) च्या वतीने 'जॉय ऑफ गिव्हिंग' या हृदयस्पर्शी ख्रिसमस दान संकलन उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. ख्रिसमस सणाच्या निमित्ताने पार पडलेल्या या उपक्रमाने आय.एम.एस. परिवारात सहानुभूती, करुणा आणि एकात्मतेचा खरा भाव निर्माण केला. या उपक्रमात संकलित वस्त्र, पुनर्वापरयोग्य साहित्य आणि आर्थिक मदतीचे वाटप तीन लाभार्थ्यांना करण्यात आले - आयडियल हेल्पिंग हँड फाउंडेशन (प्रतिनिधी म्हणून कु. निर्मला केदारी), गाडगेबाबा आश्रम शाळा, टाकळी काझी, आणि मतीमंद मुलांची शाळा, अहमदनगर. 'जॉय ऑफ गिव्हिंग' या उपक्रमाने सामाजिक जबाबदारीची जाणीव अधिक दृढ केली. दयाळूपणा आणि उदारतेच्या मूल्यांना प्रोत्साहन देत आय.एम.एस. परिवाराने एकतेचा संदेश दिला.

कार्यक्रमाची दिवसाची सुरुवात गाडगेबाबा आश्रम शाळेतील १५० विद्यार्थ्यांना खाऊ पाकिटांचे वितरण करून झाली. या कार्यक्रमात शाळेचे शिक्षक झिरवाळ सर आणि हारदे सर यांचे सहकार्य लाभले, तसेच अहमदनगर जिल्हा बँकेचे माजी उपाध्यक्ष संपत म्हस्के यांचीही उपस्थिती होती. प्रा. गौरी पाटील आणि प्रा. विजय शिंदे यांनी उपक्रमाचे महत्त्व आणि उद्दिष्ट स्पष्ट केले. दुपारच्या सत्रात दान समारंभाची सुरुवात प्रा. उत्कर्षा देठे यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. अहमदनगर कॉलेजच्या कु. फिमी हिने लाँग टाईम अगो इन बेतलेहेम हे गाणं सादर करून सर्वांना मंत्रमुग्ध केले.आयडियल हेल्पिंग हँड फाउंडेशनच्या संस्थापक निर्मला केदारी मॅडम यांना दान वस्तू सुपूर्द करण्यात आल्या. त्यांच्यासोबत त्यांच्या सहकारी स्वप्नाली वाघमारे, रंजना पवार आणि परिचारिका विद्यार्थिनीही उपस्थित होत्या. केदारी यांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणि गरजूंसाठी केलेल्या उपक्रमांची माहिती दिली. मतीमंद मुलांच्या शाळेसाठी आर्थिक मदतीच्या स्वरूपात गणवेश आणि आवश्यक साहित्य पुरवले गेले.

उपक्रमाच्या यशात संचालक डॉ. मेहतांच्या पाठिंब्यासह एम.एन. सथ्था चॅरिटेबल ट्रस्ट चा मोठा वाटा होता. कार्यक्रमाला, एम.बी.ए. आणि एम.सी.ए. विभागातील प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी आणि ग्रंथालयीन कर्मचारी उपस्थित होते. याशिवाय, डॉ. विक्रम बार्नबस, प्रा. डॉ. प्रणोती तेलोरे, प्रा. गौरी पाटील, प्रा. विजय शिंदे, प्रा. उत्कर्षा देठे, नरेंद्र कदम, जितिन आदव, सिराज मुलाणी, कु. कृष्णकुमारी थोरे, विजय पाटोळे, राजेश कांबळे आणि सौ. रझिया शेख यांच्या अथक प्रयत्नांमुळे हा उपक्रम यशस्वी झाला. उपक्रमाचे आयोजन डॉ. स्वाती बार्नबस (ग्रंथपाल) आणि वरील उल्लेख केलेल्या मान्यवरांच्या टीमने केले.

'जॉय ऑफ गिव्हिंग' या उपक्रमाने समाजासाठी काहीतरी करण्याचा संदेश दिला आणि एकात्मता व सकारात्मकतेची भावना रुजवली.

## रेडिओनगर तर्फे २१ डिसेंबर रोजी रफी के गीत कराओके गायन स्पर्धा




नगर – २४ डिसेंबर हा स्वर्गीय मोहम्मद रफी यांचा जन्मदिवस, यानिमित्त स्नेहालयाचे लोकमाध्यम रेडिओ नगर ९०.४ एफएम तर्फे मोहम्मद रफी यांनी गायलेली मराठी, हिंदी तसेच युगल गीते या कराओके गीत गायन स्पर्धेचे आयोजन केलेले आहे. सदरच्या स्पर्धे साठी कोणतेही नोंदणी मूल्य नसून सर्व वयोगटासाठी ही मोफत व खुली स्पर्धा आहे.

स्पर्धेला आकर्षक बक्षीसे व प्रमाणपत्र देण्यात येणार असून स्पर्धेमध्ये पात्र ठरलेल्या गायक गायिका यांचे निवडलेले सादरीकरण स्वर्गीय मोहम्मद रफी यांच्या जन्मदिवसाच्या दिवशी २४ डिसेंबर रोजी रेडिओनगर वरून प्रसारित केले जाणार आहे.

सदरची स्पर्धा २१ डिसेंबर रोजी रेहमत सुलतान हॉल सर्जेपुरा येथे दुपारी १२ ते ३ या वेळेत होणार आहे. तरी इच्छुक गायकांनी यामध्ये सहभाग नोंदवावा, असे आवाहन रेडिओ नगर ९०.४ तर्फे करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी संपर्क ९००२६६८५५५, ९०११११२३९०.

# गॅदरिंग केवळ कार्यक्रम नाही तर मैत्री, 'सामंजस्य आणि नवनिर्मिती'चे प्रतीक

### गणेश घोरपडे यांचे प्रतिपादन

नगर – विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळण्याचे एकमेव ठिकाण म्हणजे शाळा. शालेय जीवनात गॅदरिंग हा एक असा सोहळा आहे जो प्रत्येक विद्यार्थ्याच्या मनात कायमचा ठसा उमटवतो. गॅदरिंग हे केवळ कार्यक्रमांचे संचलन नाही, तर ते मैत्री, सामंजस्य, आणि नवनिर्मिती यांचे प्रतिक आहे, असे प्रतिपादन वरिष्ठ आयकर अधिकारी गणेश घोरपडे यांनी केले.


अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या नवीन मराठी शाळा विश्रामबाग, अध्यापक विद्यालय व पूर्व प्राथमिक वर्गांच्या स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले

अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या नवीन मराठी शाळा विश्रामबाग, अध्यापक विद्यालय व पूर्व प्राथमिक वर्गांच्या स्नेहसंमेलन प्रसंगी ते अध्यक्ष म्हणून बोलत होते. या प्रसंगी संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया, जयश्री घोरपडे, संस्थेच्या विश्वस्त मंडळाचे सदस्या सुनंदा भालेराव, अँड.गौरव मिरिकर, संस्थेच्या सल्लागार समिती सदस्य भूषण भंडारी, पुष्पाताई फिरोदिया, प्राचार्य संदीप उबाळे, मुख्याध्यापिका वनिता गोत्राळ, इन्चार्ज पूनम दारूणकर, शिक्षक प्रतिनिधी जितेंद्र निकम, शुभांगी कुंभार, आदर्श विद्यार्थी समर्थ दिंडे, समीक्षा शहापूरकर, पार्थ बहिर, साक्षी कराळे आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना गणेश घोरपडे म्हणाले की शाळा ही फक्त अभ्यासाचे मंदिर नाही, तर ती आपल्याला जीवनातील विविध कौशल्ये शिकवणारी प्रयोग शाळा आहे. गॅदरिंगच्या निमित्ताने नृत्य, संगीत, नाटक, आणि विविध स्पर्धांद्वारे सृजनशीलता आणि आत्मविश्वास उलगडतो. अभ्यासाच्या व्यापातून थोडी विश्रांती घेत, आपल्या अंगातील कलागुणांना वाव देण्याचा सोहळा असतो.मला आजही माझ्या शालेय जीवनातील सर्व आठवणी ताज्या आहेत.मी या शाळेचा माजी विद्यार्थी आहे याचा मला निशचितपणे अभिमान आहे. प्राथमिक शाळेतील माझे शिक्षक, मित्र आजही मला आठवतात.या संस्थेमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष प्रयत्न केले जातात हे मी अनुभवले आहे. अहमदनगर एज्युकेशन सोसायटी या संस्थेचा मी सदैव ऋणी राहीन.

यावेळी बोलताना जयश्री घोरपडे म्हणाल्या की साहेब नेहमी त्यांच्या शालेय जीवनातील आठवणी सांगत असतात. आज प्रत्यक्ष ती शाळा, स्नेहसंमेलनाची भव्यता पहावयास मिळाली. या संस्थेतील विद्यार्थी निशचितपणे नशीबवान आहेत. संस्थेच्या शाळांमध्ये विद्यार्थी हाच मुख्य केंद्रबिंदू मानला जातो. विद्यार्थी सर्वांगीण विकासासाठी सतत विविध उपक्रम, स्पर्धा सुरू असतात. भविष्यातील विविध संकल्पनांची माहिती प्रास्ताविक मधून संस्थेच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया यांनी करून दिली. यावेळी अनेक गुणवंत विद्यार्थ्यांचा पारितोषिक देवून सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांनी विविध कलाविष्कार सादर केले. सूत्रसंचालन अध्यापक विद्यालयातील विद्यार्थी हर्षद थोरात, शीतल खोडदे, प्रांजली डोंगरे, साक्षी मेटे यांनी केले.

# आजच्या विद्यार्थ्यांनी काळानुसार बदलांचा स्वीकार केला पाहिजे

### व्याख्याते प्रा. गणेश शिंदे यांचे प्रतिपादन; श्रीकांत पेमराज गुगळे हायस्कूल व महेंद्र मधुकर वारे कनिष्ठ महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण

नगर – मनुष्याला सर्वगुण संपन्न नागरिक घडविणारी शाळा असते. शाळेतून मिळालेल्या संस्कारातून विद्यार्थी तयार होत असतात. अभ्यासाबरोबरच विद्यार्थ्यांमधील कला–गुणांना वाव देणारा स्नेहसंमेलन हे विशेष आकर्षण असते. विद्यार्थ्यांनी शिक्षकांचा आदर करुन त्यांनी सांगितलेल्या सूचनांचे पालन केल्यास जीवनात कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही. आपल्यातील क्षमता ओळखून त्यांना योग्य दिशा देण्याचे काम शाळेतून होत असते. आजच्या विद्यार्थ्यांनी काळानुसार बदलांचा स्वीकार केला पाहिजे. आजच्या युवा पिढीने आपल्या शिक्षणाचा उपयोग समाजाच्या उन्नतीसाठी केला पाहिजे. मुलांनी त्यांची ओळख स्वतः निर्माण केली पाहिजे. आज विविध क्षेत्रात करिअरच्या मोठी संधी उपलब्ध होत आहे. त्यामुळे आपले जीवनातील ध्येय निश्चित करुन त्यादृष्टीने मार्गक्रमण करावे. शाळेतील दिवस जीवनातील सर्वात आनंदी दिवस असतात. पुढील आयुष्यातील तो अनमोल ठेवा आहे असे प्रतिपादन व्याख्याते व राज्य कृषी परिषदेचे संचालक प्रा. गणेश शिंदे यांनी केले.


शिशु संगोपन संस्थेच्या श्रीकांत पेमराज गुगळे हायस्कूल व महेंद्र मधुकर वारे कनिष्ठ महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभाचे उद्‌घाटन व्याख्याते प्रा. गणेश शिंदे यांच्या हस्ते झाले.

शिशु संगोपन संस्थेच्या श्रीकांत पेमराज गुगळे हायस्कूल व महेंद्र मधुकर वारे कनिष्ठ महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभाचे उद्‌घाटन प्रा. गणेश शिंदे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी हृदयरोग तज्ञ डॉ. राहुल अग्रवाल, बालरोग तज्ञ डॉ. दिपी अग्रवाल, संस्थेचे अध्यक्ष दिलीप गुंदेचा, उपाध्यक्ष दशरथ खोसे, सचिव र.धों. कासवा, सहसचिव राजेश झालानी आदि उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. राहुल अग्रवाल म्हणाले कि शाळेतील शिक्षक नेहमीच विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी प्रयत्न करत असतात. सर्वसामान्य परिस्थितीतील मुलांसाठी विशेष शाळा राबवित असलेले उपक्रम कौतुकास्पद असेच आहे. विद्यार्थ्यांनी आपल्यातील क्षमता ओळखून त्यादृष्टीने ध्येय ठेवून अभ्यास करावा. यश आपणास निश्चित मिळेल, असे सांगितले.

संस्थेचे अध्यक्ष दिलीप गुंदेचा म्हणाले, संस्थेच्यावतीने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. शिक्षकांच्या सहकार्याने विद्यार्थीही अनेक स्पर्धा, परिक्षांमध्ये यशस्वी होऊन संस्थेचे नाव उज्वल करत आहेत. स्नेहसंमेलनातून विद्यार्थ्यांचा कला–गुणांना व्यासपीठ मिळवून देत. गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करुन प्रोत्साहन देत असल्याचे सांगितले.

याप्रसंगी संस्थेचे विश्वस्त विजय गुंदेचा, वसंतलाल चोपडा, संजय चोपडा, मनसुखलाल पिपाडा, बन्सी नन्नवरे, रश्मी येवलेकर, एल.के. आव्हाड, चंद्रकांत अनेचा, सचिन डागा, प्रिती डागा, प्रमिला बोरा, सीमा गुंदेचा, शिवनारायण वर्मा, विलास पटवा, हर्षल अनेचा, कांचन गावडे, विनोद कटारिया, मुख्याध्यापिका योगिता गांधी, प्राचार्य दत्तात्रय कसबे आदि उपस्थित होते.

प्रास्तविकात प्राचार्य दत्तात्रय कसबे यांनी संस्थेच्यावतीने राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. शिक्षक प्रतिनिधी उज्वला सूर्यवंशी यांनी अहवाल वाचन करुन वर्षभराचा आढावा सादर केला.

यावेळी विविध क्षेत्रात नैपुण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, समाजप्रबोधनपर गिते, भारुडे आदि नृत्यपर कार्यक्रम सादर करण्यात आले.

तसेच यावेळी प्राचार्य दत्तात्रय कसबे, उपशिक्षिका उज्वला सूर्यवंशी, प्रा. संजय शेवाळे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल व प्रा.सुभाष चिंधे यांची राज्य कनिष्ठ महाविद्यालय हिंदी अध्यापक संघाच्या राज्य कार्यकारणीवर निवड झाल्याबद्दल सन्मान करण्यात आला

सूत्रसंचालन वैष्णवी किंद्रे व उमादेवी राऊत यांनी केले. पारितोषिक वितरणचे समारंभाचे सूत्रसंचालन प्रविण पाटील यांनी केले. सांस्कृतिक कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आशा वरखडे व कल्पना तुपे यांनी केले. शेवटी प्रा.सुभाष चिंधे यांनी आभार मानले.


अल्पसंख्यांक हक्क दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ

## अल्पसंख्यांक समाजाचे प्रश्न सोडविण्याबाबत प्रशासनाची सकारात्मक भूमिका – जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ

नगर – अल्पसंख्यांक समाजाच्या समस्यांविषयी शासन सकारात्मक असून त्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न प्रशासनामार्फत करण्यात येत आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी केले.

अल्पसंख्यांक हक्क दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या राजस्व सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाला अपर जिल्हाधिकारी प्रवीण महाजन, बाळासाहेब कोळेकर, जिल्हा नियोजन अधिकारी दीपक दातीर, महानगरपालिका उपायुक्त प्रियंका शिंदे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी देविदास कोकाटे, अल्पसंख्याक समाज प्रतिनिधी यश शहा, हरजितसिंग देवेंद्रसिंग वधवा, सय्यद वहाब व सय्यद अफजल अब्दुल कादर आदी उपस्थित होते.

जिल्हा अल्पसंख्यांक समितीची दर तीन महिन्यांतल्या पहिल्या मंगळवारी बैठक आयोजित करण्यात यावी अशी सूचना करीत जिल्हाधिकाऱ्यांनी उपस्थितीत अल्पसंख्याक प्रतिनिधींकडून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.

अल्पसंख्याक समाजाच्या वतीने उपस्थित प्रतिनिधींनी अल्पसंख्यांक समाजाच्या विविध मागण्या व समस्यांबाबत मते मांडली. बैठकीला अल्पसंख्यांक विभागाच्या योजना राबविणाऱ्या विविध शासकीय विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# शहराच्या विकासाबरोबरच हिंदू धर्मकार्य व गो रक्षणासाठीही काम करणार

### आ. संग्राम जगताप यांचे प्रतिपादन; गो मातेच्या जयजयकारात जय आनंद फाउंडेशनच्या वतीने 'गो रक्षक आमदार' उपाधीने सत्कार

नगर – नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत सर्वांच्या मतरुपी आशीर्वादाने मला तिसऱ्यांदा विजय संपादन करता आला आहे. माझ्या विजयाने नगरकरांच्या खूप मोठ्या अपेक्षा वाढल्या आहेत. जनतेच्या सर्व अपेक्षा शहर विकासाच्या माध्यमातून पूर्ण करणार आहेच. यासाठी सर्वांना एकत्रितपणे बरोबर घेत शहराच्या विकासासाठी काम करून हिंदू धर्मकार्य व गो रक्षणासाठीही काम करणार आहे, असे प्रतिपादन आ.संग्राम जगताप यांनी केले.


जय आनंद फाउंडेशनच्या वतीने आ.संग्राम जगताप यांनी गो रक्षणासाठी घेतलेल्या पुढाकाराबद्दल त्यांना 'गो रक्षक आमदार' ही उपाधी देऊन सत्कार करण्यात आला.

जय आनंद फाउंडेशनच्या वतीने आ.संग्राम जगताप यांनी गो रक्षणासाठी घेतलेल्या पुढाकाराबद्दल आनंदधाम जवळील अहिंसा चौकातील गो वास्तसल्य शिल्पा जवळ त्यांचा सत्कार करून 'गो रक्षक आमदार' ही उपाधी दिली. यावेळी सत्कारास उत्तर देताना आ.जगताप बोलत होते. यावेळी फाउंडेशनचे संस्थापक कमलेश भंडारी, अध्यक्ष अमित काबरा, माजी नगरसेवक विपुल शेटीया, प्रकाश भागानगरे, सीए. किरण भंडारी, रितेश पारख, गौरव बोरा आदींसह सदस्य उपस्थित होते. यावेळी हिंदू धर्माच्या व गो मातेच्या जयजयकाराच्या घोषणा उपस्थितांनी दिल्या.

आ. जगताप पुढे म्हणाले, नगर शहर ही साधू संतांची भूमी आहे. राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराजांनी अहिंसा परमो धर्माची शिकवण आपल्याला दिली आहे. त्यांच्या समाधी जवळील या चौकाचे जय आनंद फाउंडेशने अहिंसा चौक नामकरण करून गो वास्तसल्याचे सुरेख शिल्प येथे उभारून महाराजांचा संदेश प्रत्यक्षात आणला आहे. हा चौक व शिल्प गो संवार्धांसाठी प्रेरक ठरत आहे. आता गो मातेच्या रक्षणाची वेळ आली आहे. महायुतीच्या सरकारने देशी गायींना राज्य मातेचा दर्जा दिला आहे. भविष्यात नगर जिल्हा गो हत्या मुक्त करण्यासाठी जास्तीत जास्त गोमातेचे रक्षण करण्यासाठी सर्वांबरोबर माझाही पुढाकार असणार आहे. गोरक्षकांच्या मागेही खंबीरपणे उभे राहून त्यांना सहकार्य करणार आहे.

प्रास्ताविकात कमलेश भंडारी म्हणाले, आ.संग्राम जगताप यांच्या विजयी हॅटट्रिकने नगरकरांच्या खूप अपेक्षा वाढल्या आहेत. या अपेक्षा पूर्ण करण्यास आ.जगताप सक्षम आहेतच. आता त्यांनी गो रक्षणासाठी ही पुढाकार घेत जिल्हा गो हत्या मुक्त करण्याची भूमिका घेतली आहे. हे आमच्यासाठी खूप आनंदायी आहे. त्यामुळेच त्यांना अहिंसा चौकात 'गो रक्षक आमदार' ही उपाधी देत त्यांचा सन्मान करून त्यांच्या या कार्यात सहभागी होणार आहोत. गोमातेच्या आशीर्वादाने त्यांना हुलकावणी दिलेले मंत्रिपदही लवकरच मिळेल, अशी मला खात्री आहे.

यावेळी सुमीत लोढा, कुणाल बडजाते, गौतम मुथा, नीलेश पोखरणा, सुनील गुगळे, सुभाष कर्नावट, अतुल शिंगवी, राहुल सोनीमंडलेचा, मनीष फूलडहाळे, अतुल कावळे आदींसह सदस्य उपस्थित होते.

# अहिल्यानगर–माथेरान पर्यटन मैत्री उपक्रम शहराच्या पर्यटन विकासाचे नवे पर्व

नगर – निसर्गाच्या सुंदर आविष्काराचे दर्शन अनुभवण्यासाठी माथेरानला देश विदेशातील पर्यटक मोठ्या संख्येने भेट द्यायला येतं असतात. निसर्गाचा आनंद घेतात. ज्याप्रमाणे येथे निसर्गाची अनुभूती येते. त्याप्रमाणे ऐतिहासिक आणि धार्मिक वारसा लाभलेलं अहिल्यानगर पर्यटनाच्या नकाशावर यायला हवे, येथील वास्तूंना वैभवशाली इतिहास आहे. हा वारसा योग्य प्रकारे जतन केला आणि येथे भेट देणाऱ्या पर्यटकांना सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्यास देश विदेशातील पर्यटक अहिल्या नगरला जाणून घेण्यासाठी मोठ्या संख्येने येतील. या पार्श्वभूमीवर शहराच्या पर्यटन विकासासाठी निरपेक्षपणे कार्य करणारे जयंत येलुलकर यांचे रसिक ग्रुपच्या माध्यमातून कृतिशील प्रयत्न प्रेरणादायी आहेत. माथेरान प्रतिष्ठानचे त्यांना कायम सहकार्य असेल असे प्रतिपादन माजी नगराध्यक्ष व माथेरान प्रतिष्ठानचे पदाधिकारी प्रसाद सावंत यांनी केले.



पर्यटन मैत्री उपक्रमांतर्गत रसिक ग्रुपच्या नियोजनाने माथेरान येथे आयोजित विद्यार्थी सहलीच्या स्वागत कार्यक्रमात बोलताना जयंत येलूलकर. दुसऱ्या छायाचित्रात सहभागी विद्यार्थिनी.

अहिल्यानगर – माथेरान पर्यटन मैत्री उपक्रमा अंतर्गत रसिक ग्रुपच्या नियोजनाने माथेरान येथे आयोजित विद्यार्थी सहलीच्या स्वागत कार्यक्रमात श्री.सावंत बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रतिष्ठानचे सचिव विवेक चौधरी होते. यावेळी रसिक ग्रूपचे अध्यक्ष जयंत येलुलकर, रेणाविकर माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक राजेंद्र कांबळे, पत्रकार नितीन कदम, अजय कदम, गिरीष सावंत, राजेश भालसिंग, स्नेहल उपाध्ये यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे अध्यक्ष विवेक चौधरी म्हणाले की, पर्यटनाला जगात मोठें महत्व आले असुन अनेक देशांचे आर्थिक स्त्रोत पर्यटनावर अवलंबून असते. माथेरानला भेट देणाऱ्या पर्यटकांना अहिल्या नगरला भेट देण्यासाठी आम्ही आवर्जुन आवाहन करीत असतो. गेल्या वर्षभरात येथील जवळपास तीनशे पर्यटकांनी नगरला भेट दिली आहे याचे श्रेय शहरावर मनापासुन प्रेम करणाऱ्या रसिक ग्रुपला आहे.

अजय सावंत यांच्या नेतृत्वाखाली असलेले माथेरान प्रतिष्ठान व जयंत येलुलकर यांनी आपल्या शहराची गरिमा लक्षात घेत त्यांच्या पर्यटन वाढीसाठी सुरू केलेले प्रयत्न भविष्यात शहराच्या पर्यटन विकासासाठी निश्चितच फलदायी ठरतील असा विश्र्वास व्यक्त केला. रसिक ग्रुपच्या पुढाकाराने सुरू झालेल्या नगर माथेरान पर्यटन मैत्री अंतर्गत सहलीसाठी सर्व प्रकारचे सहकार्य केले जाईल असेही ते म्हणाले

यावेळी रेणाविकर माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक राजेंद्र कांबळे म्हणाले की, माथेरान येथील निसर्गसौंदर्य मनाला भुरळ घालणारे असुन विद्यार्थी विविध स्थळांच्या भेटीने हरखून गेले. मुक्कामाची उत्तम व्यवस्था, रुचकर भोजन, मुलांसाठी मनोरंजन, जादूचे प्रयोग, सांस्कृतीक कार्यक्रम, माथेरानची मिनी ट्रेन, स्थळांची माहिती देणारे गाईड, उत्कृष्ट नियोजन यामुळें शाळेची सहल संस्मरणीय झाली.

जयंत येलुलकर प्रास्ताविकात बोलतांना म्हणाले की अहिल्यानगर शहराला मोठा ऐतिहासिक आणि धार्मिक वारसा आहे, शहराची गरिमा सर्वदुर जाऊन हे शहर पर्यटनाचे महत्वाचे शहर व्हावे या इच्छेतून अजय सावंत यांच्या सहकार्याने दोन शहरांचे मैत्रीचे पर्व सुरू झाले. पर्यटन विकासासाठी दोन संस्थांनी आपल्या शहरासाठी राबविलेला पर्यटन मैत्रीचा हा उपक्रम भारतातील पहिलाच असावा याचा उपयोग दोन्हीं शहरांना होत आहे. शहराच्या पर्यटन विकासासाठी सुरू झालेली ही चळवळ महत्वाची असून याचा मोठा आनंद आहे.

यावेळी शाळेचे शिक्षकवृंद, प्रमूख पाहूणे यांचा आयोजकांच्या वतीने अनिल गायकवाड, प्रसन्न एखे यांनी सत्कार केला. सुरुवातीला अहिल्या नगरहून निघालेल्या या सहलीचा प्रारंभ उद्योजक जितेंद्र बिहाणी व किरण कथडे यांच्या हस्ते करण्यात आला. रसिक ग्रूपचे निखिल डफळ यांनी स्वागत केले. सौ. स्नेहल उपाध्ये यांनी आभार मानले.

# चायना व नायलॉन मांजा विक्री बंद करुन शहरात जप्ती मोहिम राबवा

## अन्यथा आयुक्तांच्या दालनात आंदोलन करणार : गणेश कवडे



नगर – शहरातील चायना मांजा व नायलॉन मांजाची तपासणी करून त्यांच्या कडून या नायलॉन मांजा चायना मांजा जप्तीची मोहिम राबविण्यात येवून दंडात्मक कारवाई करावी अन्यथा आपल्याला कोणत्याही प्रकरची पुर्वसुचना न देता अचानकपणे आपल्या दालनात तिव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात यईल असा इशारा स्थायी समितीचे माजी सभापती गणेश कवडे यांनी आयुक्तांना दिला आहे.

यासंदर्भात दिलेल्या निवेदनात कवडे यांनी म्हटले आहे की, डिसेंबर व जानेवारी महिन्यात मोठ्या प्रमाणात पतंग व मांज्याची विक्री होत असते. पतंग उडविणे हा लहान मुलांचा आवडता खेळ आहे. पतंग उडविणे लहान मुलांप्रमाणे सर्व वयोगटातील मुले–मुली खेळामध्ये सहभागी होवुन या खेळाचा आनंद घेत असतात. पतंग उडविण्या करीता पुर्वी साध्या दोऱ्याचा वापर होत असल्याने त्यापासुन कोणत्याही पशु पक्षी व नागरीकांना या पासुन धोका निर्माण होत नसे. परंतु गेल्या काही वर्षा पासुन बाजारामध्ये चायना मांजाची विक्री मोठया होत असल्याचे निदर्शनास येत आहे. हा मांजा अत्यंत धारदार असून सहजासहजी तुटत सुध्दा नाही. उंची इमारतींवरून मुले पतंग उडवत असल्याने पतंगाचा मांज्या अनेक रस्त्यांना क्रॉस करून जातो. रस्त्यावरील नागरीकांना मांज्या सहजासहजी दिसत नसल्याने मोठे अपघात होवून जिवीत हानी झालेली आहे. तसेच पशु पक्ष्यांना सुध्दा इजा होवून त्यांचा मृत्यु होत असतात. तसेच सदर मांजा मुळे पर्यावरणाची सुध्दा हानी होत आहे. शहरातील पतंग व मांजा विक्रेत्यांकडे चायना मांज्याची अनाधिकृत पणे राजरोसपणे विक्री होत आहे. याकडे प्रशासनाचे लक्ष होत आहे.

# महापालिकेच्या ढिसाळ कारभारामुळे शहरात स्वच्छतेचा प्रश्न गंभीर बनला

## आठ दिवसात प्रश्न मार्गी न लागल्यास मनपाच्या आवारात कचरा आणून टाकू : गणेश भोसले





नगर – अहिल्यानगर महानगरपालिकेच्या ढिसाळ कारभारा–मुळे शहरातील स्वच्छतेचा प्रश्न गंभीर बनला असून सर्वत्र कचऱ्याचे ढिग दिसत आहे. गेल्या काही दिवसांपासुन घंटा गाड्या कचऱ्याचे संकलन करण्यासाठी येत नसल्यामुळे नागरीक आपला कचरा सर्रासपणे रस्त्याच्या कडेला, मोकळ्या जागेत, चौका–चौकात आणून टाकत आहेत. दिवसभरात प्रभागातील सुमारे १०० नागरीक कचऱ्याच्या प्रश्नासंदर्भात माझ्याकडे फोनद्वारे तक्रारी करत आहेत. नागरिकांच्या तक्रारीकडे मनपाचे दुर्लक्ष होत असून त्यांना याचे काही देणेघेणे नाही शहरात कचऱ्यामुळे नागरीकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला असून सर्वत्र दुर्गंधी पसरली आहे. साथीचे आजार पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही. विशेष म्हणजे मनपाच्या मुख्य प्रशासकीय आवारातच कचऱ्याचा ढीग पाहायला मिळत असून शहरात काय परिस्थिती निर्माण झाली असेल याची प्रशासनाने पाहणी करावी.

मनपा प्रशासनाने येत्या आठ दिवसांमध्ये कचरा उचलण्याचे व स्वच्छतेचे नियोजन करावे अन्यथा महापालिकेच्या आवारात कचरा आणून टाकण्याचे आंदोलन करण्यात येईल असा इशारा मनपा आयुक्त यशवंत डांगे यांना माजी उपमहापौर गणेश भोसले यांनी निवेदनाद्वारे दिला.

# व्यापाऱ्यास जीवे मारण्याची धमकी देऊन खंडणी मागणारे २ आरोपी पोलिसांनी पकडले

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई, बनावट आधारकार्डचा वापर करून सीमकार्डची खरेदी



व्यापाऱ्यास जीवे मारण्याची धमकी देऊन खंडणी मागणाऱ्या २ आरोपींना पकडल्यानंतर त्यांच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

नगर – व्यापाऱ्यास जीवे मारण्याची धमकी देऊन खंडणी मागणाऱ्या २ आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडले आहे. अजय अरूण साळवे (वय ४२, रा.माधवबाग, आलमगीर, भिंगार), पवन प्रमोद उघडे (वय २४, रा.सदर बाजार, भिंगार) अशी त्यांची नावे आहेत. त्यांनी बनावट आधारकार्डचा वापर करून सीमकार्डची खरेदी करत त्याद्वारे मेसेज केले असल्याचे समोर आले आहे.

किरण मोहनलाल राका (वय ५६, रा.आदर्श कॉलनी, अहिल्यानगर) हे दि.१४ डिसेंबर रोजी सर्जेपुरा येथून घरी जात असताना अज्ञात आरोपींनी सायकलवर येऊन, फिर्यादीस आडवून भाई का फोन आयेगा उठालो असे म्हणुन निघुन गेले. त्यानंतर फिर्यादीचे मोबाईलवर मेसेज पाठवून जीवे मारण्याची धमकी दिली. याबाबत तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

गुन्हा दाखल झाल्यावर पोलीस अधिक्षक राकेश ओला यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि. दिनेश आहेर यांना या गुन्हयांचा समांतर तपास करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार पो.नि. आहेर यांनी स्थानिक गुन्हे शाखेतील पोलिस उपनिरीक्षक तुषार धाकराव व पोलीस अंमलदार संदीप पवार, संतोष खैरे, सागर ससाणे, रविंद्र घुंगासे, मेघराज कोल्हे, प्रशांत राठोड व महादेव भांड यांचे पथक नेमून तपास सुरु केला. तपास पथकाने घटना ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज व तांत्रीक विश्लेषणाच्या आधारे आरोपींचा नगर शहरामध्ये शोध घेत असताना पथकास गोपनीय माहिती मिळाली की, नमूद गुन्हयातील संशयीत आरोपी हे रामवाडी रोड, तारकपूर येथे विना क्रमांकाच्या अॅक्टीव्हा मोटारसायकलसह थांबलेले आहेत. मिळालेल्या माहितीच्या आधारे तपास पथकाने रामवाडी रोडवर संशयीत विनाक्रमांकाचे क्टीव्हा गाडीवरील अजय अरूण साळवे, व पवन प्रमोद उघडे यांना ताब्यात घेतले.

आरोपीची झडती घेऊन, त्यांच्या ताब्यातून ८२ हजार रुपयांचा मुद्देमाल त्यात एक ग्रे कलरची अॅक्टीव्हा, नोकीया व जिओ कंपनीचे मोबाईल, विजय अरूण नवगिरे याचे आधारकार्ड पॅनकार्ड व बॅक पासबुक, एक रबरी स्टॅम्प, अनोळखी इसमाचे फोटो असा मुद्देमाल जप्त केलेला आहे.

ताब्यातील आरोपी अजय साळवे याच्या कडे विचारपुस केली असता, त्याने खोटया कागदपत्रांचा वापर करून दिपक राजु भुजबळ (रा.घासगल्ली, कोठला) याचे विजय अरूण नवगिरे (रा.कल्याण रोड, शिवाजीनगर) या नावाने बनावट आधारकार्ड तयार केले. त्या बनावट आधारकार्डच्या आधारे वेगवेगळी कागदपत्रे तयार केली. आरोपी अजय साळवे याने व्यापारी किरण राका यांच्याकडून खंडणी वसुल करण्याचे उद्देशाने २२ नोव्हेंबर रोजी बनावट कागदपत्रावरून त्याने एअरटेल कंपनीचे ८१४९६१४००९ या क्रमांकाचे नवीन सिमकार्ड घेतले. १४ डिसेंबर रोजी रात्री ८ ते ९ वाजण्याच्या सुमारास आरोपी पवन प्रमादे उघडे याचेसह अॅक्टीव्हा मोटारसायकलवर जाऊन फिर्यादीस अडवून धमकावले व नंतर त्यांच्याकडील नोकीया मोबाईलद्वारे फिर्यादी यांना खंडणी मागण्याकरीता धमकी दिल्याची माहिती सांगितली. ताब्यातील आरोपींना गुन्ह्याचे तपासकामी तोफखाना पोलीस स्टेशन येथे मुद्देमालासह हजर करण्यात आले आहे.

# अहिल्यानगर शहर व परिसरात नायलॉन मांजाची विक्री सुरूच

## भिंगारमध्ये पोलिसांनी केला ४६ हजारांचा मांजा केला जप्त



भिंगारमध्ये २ ठिकाणी छापे टाकून ४६ हजारांचा नायलॉन मांजा पकडल्यानंतर मुद्देमालासह भिंगार कॅम्प पोलिसांचे पथक.

नगर – मकर संक्रांत जवळ आल्याने शहर व परिसरात पतंग उडविण्यासाठी बंदी घातलेल्या नायलॉन मांजाची चोरट्या पद्धतीने विक्री करण्यात येत आहे. स्थानिक गुन्हे शाखा, तोफखाना, कोतवाली पोलिसांच्या कारवाई पाठोपाठ भिंगार कॅम्प पोलीसांनीही मोठी कारवाई करत केला ४६ हजारांचा नायलॉन मांजा जप्त केला आहे.

स.पो.नि. जगदीश मुलगीर यांना माहीती मिळाली की, सुमित संतोष हळगावकर (वय– २०,रा. दाणेगल्ली भिंगार), गुलाब समिर शेख (वय–२२ रा.वाघस्कर गल्ली, भिंगार) यांनी त्यांच्या राहत्या घरामध्ये महाराष्ट्र शासनाने बंदी घातलेला नायलॉन मांजा विक्री करण्याच्या उद्देशाने साठा करून ठेवलेला आहे. ही माहिती मिळताच त्यांनी कारवाई साठी पथक पाठविले. या पथकाने दोन्ही ठिकाणी छापा टाकून ४६ हजार रुपये किंमतीचे ४६ नायलॉन मांजाचे रिळ जप्त केले. या दोघांच्या विरुद्ध भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २२३, १२५ सह पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम ५,१५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास पो. ना. शाहीद शेख हे करत आहेत.

सदरची कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक जगदीश मुलगीर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक योगेश शिंदे, पो.हे.कॉ. दिपक शिंदे, रवी टकले, पो.कॉ. प्रमोद लहारे, अमोल आव्हाड यांनी केली आहे.



सरपंच हत्येतील आरोपींवर कठोर कारवाई करावी, या मागणीचे निवेदन पोलिस अधीक्षक कार्यालयाकडे देताना छावा व जिजाऊ ब्रिगेडचे पदाधिकारी.

# सरपंच हत्येतील आरोपींवर कठोर कारवाई करण्यात यावी

## छावा व जिजाऊ ब्रिगेडची मागणी

नगर – मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर रोजी अपहरण करून निर्घृण हत्या करण्यात आली. या घटनेचा जिजाऊ ब्रिगेड बीड कडून जाहीर निषेध करण्यात येत आहे. सदरील हत्या ही माणूसकीला काळीमा फासणारी आहे. या हत्येमागे एक मोठी बलाढ्य शक्ती आहे. ज्यामुळे समाजातील निरपराध लोकांचा बळी जात आहे. या प्रवृत्तीला वेळीच आवर घातला नाही तर समाजाचा पोलीस यंत्रणेवरील व न्यायपालिकेवरचा विश्वास संपून जाईल तसेच परभणी येथील आंदोलनकर्ते व संविधानरक्षक अॅड. सोमनाथ सूर्यवंशी यांचा देखील पोलीस कोठडीत मृत्यू झाला. या दोन्ही प्रकरणातील दोषींना कठोरातील कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी जिजाऊ ब्रिगेड यांच्या वतीने पोलिस अधीक्षकांना निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी छावा मराठा संघटनेच्या जिल्हाध्यक्षा श्रीमती सुरेखा सांगळे पा., जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्षा संपूर्णा सावंत, शीलाताई शिंदे, सुरेखा कडूस, स्वाती शेटे, वंदना निघुटे, राजश्री वाणी, शोभा भालसिंग आदी उपस्थित होत्या.

# विश्वसनीय सेवा व दर्जेदार उत्पादनांमुळे सोनी गिफ्टचा नावलौकिक

## नरेंद्र फिरोदिया यांचे प्रतिपादन



नगरमधील फ्रँचाईसी बाय डिबी व्हेंचर्सच्या प्रोफेसर कॉलनी चौकातील सोनी गिफ्ट दालनाच्या पाचव्या वर्धापन दिनानिमित्त नरेंद्र फिरोदिया यांनी दालनास भेट दिली.

नगर – सोनी गिफ्ट दालनाने पाच वर्षांच्या वाटचालीत सर्वोत्कृष्ट सेवा आणि दर्जेदार उत्पादने उपलब्ध करून देत ग्राहकांचा विश्वास व प्रेम मिळवले आहे. वर्धापन दिनानिमित्त या दालनात सर्व ब्रॅण्डेड वस्तूंवर ५० टक्क्यापर्यंत सवलत देण्यात येत आहे. तसेच काही निवडक वस्तूंवर ६० टक्क्यापर्यंत सूट दिली जात आहे. गृहपयोगी वस्तू खरेदी करणाऱ्या लाडक्या बहिणींसाठी हे मोठे गिफ्ट आहे. येथील भरपूर स्टॉक चोखंदळपणे मनपसंत खरेदीचा आनंद देणारा आहे, असे प्रतिपादन उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांनी केले.

## लाडक्या बहिणींना खास गिफ्ट, सर्व ब्रॅण्डेड वस्तूंवर ५० टक्के सवलत योजनेचा शुभारंभ

नगरमधील फ्रँचाईसी बाय डिबी व्हेंचर्सच्या प्रोफेसर कॉलनी चौकातील सोनी गिफ्ट दालनाचा पाचवा वर्धापन दिन साजरा होत आहे. यानिमित्त फिरोदिया यांनी दालनास भेट देवून १८ ते २५ डिसेंबर या कालावधीत आयोजित सवलत योजनेचा शुभारंभ केला. यावेळी संचालक प्रकाश दोडेजा, साहिल दोडेजा, नेहा दोडेजा, इशा दोडेजा, जयरामदास दोडेजा, नाशिक येथील संचालक नितीन मुलतानी आदींसह ग्राहक उपस्थित होते.

प्रकाश दोडेजा यांनी सांगितले की, कोणत्याही चांगले समारंभ, गोड आनंदाचे क्षण साजरे करताना एकमेकांना भेटवस्तू देण्याची परंपरा आहे. अशा भेटवस्तूंसाठी तसेच गृहपयोगी, संसारोपयोगी वस्तूंसाठी सोनी गिफ्ट नावाजले जाते. वर्धापन दिन साजरा करताना दालनात लाडक्या बहिणींना २५ डिसेंबर पर्यंत विविध कंपन्यांच्या ब्रॅण्डेड वस्तूंवर थेट फ्लॅट ५० टक्केपर्यंत सवलत दिली जाणार आहे. तसेच काही निवडक वस्तूंवर थेट ६० टक्केपर्यंत सूट दिली जाणार आहे. नवीन वर्षाचे स्वागत आपल्या घर संसारासाठी मनपसंत खरेदी करण्याची संधी लाडक्या बहिणींना मिळाली आहे. एकाच छताखाली आकर्षक गिफ्ट आर्टिकल्स, घरगुती वापराच्या वस्तू, गृह सजावट, होम अप्लायंसेस उपलब्ध असल्याने खरेदीचा निखळ आनंद ग्राहकांना घेता येतो. कुटुंबातील लहानांपासून ज्येष्ठापर्यंत प्रत्येकाला जे हवं ते सर्व काही उपलब्ध आहे. सर्व नामांकित कंपन्यांच्या ब्रॅण्डेड वस्तू असल्याने खात्रीशीरपणा असतो. याशिवाय उत्कृष्ट आपुलकीची सेवा मिळत असल्याने ग्राहक खरेदीसाठी आवर्जून सोनी गिफ्टमध्ये येतात. ग्राहकांचे प्रचंड प्रेम आणि प्रतिसाद लक्षात घेवून पाचवा वर्धापन दिन साजरा करताना ग्राहकांना अनोखी भेट दिली आहे. लाडक्या बहिणींनी कुटुंबियांसह दालनाला भेट देवून खरेदीचा आनंद घ्यावा, असे आवाहन दोडेजा यांनी केले आहे.

नितीन मुलतानी म्हणाले, नाशिकमध्ये गेल्या पाच दशकांपासून सोनी गिफ्टने ग्राहकांचा विश्वास संपादित केला आहे. नाशिकप्रमाणेच नगरमध्येही सोनी गिफ्ट दालनाला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. दोडेजा यांनी दर्जेदार उत्पादनांना आपुलकीच्या सेवेची जोड दिली आहे. त्यामुळे पाचवा वर्धापन दिन अतिशय उत्साहात साजरा होत असून यात ग्राहकांनाही समावून घेण्याचे काम दोडेजा यांनी केले आहे.



### स्वामींचे थंडीपासून रक्षण

नगरमध्ये थंडी वाढल्याने सावेडी उपनगरात गुलमोहर रोडवरील श्री स्वामी समर्थ मंदिरात स्वामींचे रक्षण भक्त करतात लोकरीची शाल, टोपी परिधान असलेले रूप मनाला भारावून टाकते ( छाया – विजय मते)

# विधान परिषदेच्या सभापतीपदी राम शिंदे यांची बिनविरोध निवड



नागपूर – गेल्या अडीच वर्षांहून अधिक काळ रिक्त असलेल्या विधान परिषदेच्या सभापतीची निवड करण्यात आली आहे. विधानपरिषदेमध्ये गुरुवारी (दि.१९) सकाळी सभापतीपदाचा प्रस्ताव सादर करण्यात आला. यावेळी भाजपचे आमदार आणि माजी मंत्री प्रा. राम शिंदे यांची विधानपरिषद सभापतीपदी निवड करण्यात आली. सभापतिपदाच्या निवडणुकीसाठी बुधवारी अखेरच्या दिवशी महाविकास आघाडीने उमेदवार दिला नाही. शिंदे यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची कालच निवड निश्चित झाली होती. यानंतर आज, गुरुवारी विधान परिषदेच्या सभापतीपदासाठी प्रा. राम शिंदेंच्या नावाचा प्रस्ताव विधान परिषदेत मांडण्यात आला.

यानंतर सभागृहातील सर्वांनी राम शिंदे यांची विधान परिषदेच्या सभापतीपदासाठी होकार दिला. सर्व आमदारांनी राम शिंदे यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासोबत सर्व नेत्यांनी त्यांच्यावर ही जबाबदारी सोपवली आहे.

विधान परिषदेचे माजी सभापती रामराजे नाईक–निंबाळकर यांची ७ जुलै, २०२२ रोजी सदस्यत्वाची मुदत संपुष्टात आल्यापासून सभापतिपद रिक्त होते. त्यामुळे राज्यपालांनी दिलेल्या निर्देशानुसार नागपूर येथील हिवाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे यांनी सभापतीपदाच्या निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केला होता. यासाठी १८ डिसेंबर रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत अर्ज करण्याची मुदत देण्यात आली होती. यानंतर विधान परिषदेत राम शिंदे यांच्या नावाची घोषणा झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्या उपस्थितीत ते सभापतीपदी विराजमान झाले.



### शिवसागर भवन नूतन वास्तूचे उद्घाटन

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या तपोवन हडको येथे शिवसागर भवन या नूतन वास्तूचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते झाले. यावेळी राजयोगिनी बी के सुनंदा दीदी, राजयोगी बी के दशरथ भाईजी व बी के डॉ दीपक हरके उपस्थित होते.

# काटवन खंडोबा येथील तरुण बेपत्ता

नगर – आईसोबत किरकोळ भांडण झाल्याने काटवन खंडोबा येथील संजय नगरमध्ये राहणारा गिरीश विनोद गवळी (वय २४) हा तरुण घरात कोणास काही एक न सांगता, चारचाकी गाडी घेऊन कोठेतरी निघून गेला आहे. त्याचा सर्वत्र शोध घेवूनही तो मिळून आलेला नाही. त्यामुळे त्याचा भाऊ सुरज विनोद गवळी याने कोतवाली पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे.

या तक्रारी वरून पोलिसांनी हरवल्याची नोंद केली आहे. बेपत्ता गिरीश याची उंची पाच फूट पाच इंच, वर्ण निमगोरा, शरीरबांधा सडपातळ, चेहरा उभट, नाक सरळ, सोबत टोयाटो चार चाकी वाहन (क्र. एम एच १६ डी एम २६२५) असे आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

